# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २४ जून, २०२६ / आषाढ ३, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, दिव्यांग कल्याण, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### राज्यातील औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी वीज विक्री करामध्ये वाढ केल्याबाबत

**(१) * ८८४१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.योगेश टिळेकर, श्री.सत्यजीत तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.एकनाथराव खडसे, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देत असताना, राज्य शासनाने औद्योगिक, व्यावसायिक व सौरऊर्जा वापरकर्त्यांवर ग्रीड सपोर्ट चार्ज, वीज विक्री कर वाढ तसेच टाईम ऑफ डे (TOD) नियमांमध्ये बदल केला असल्याचे व ‘पी.एम. कुसुम टप्पा ब’ आणि ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ या योजनांसाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने दिनांक १ डिसेंबर २०२५ पासून ही करवाढ लागू करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० किलोवॅटपेक्षा जास्त क्षमतेच्या सौरऊर्जा ग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करणे, नेट मीटरिंगवरील निर्बंध, रात्रीच्या वेळी सौरऊर्जेच्या वापरावर मर्यादा, ‘बिहाइंड द मीटर’ ग्राहकांकडून शुल्क आकारणीचा प्रस्ताव तसेच औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांच्या वीज विक्री करात प्रतियुनिट ९.९० रूपयांची वाढ केल्यामुळे राज्यातील औद्योगिक, व्यावसायिक व सर्वसामान्य सौर ऊर्जा ग्राहकांवर मोठा आर्थिक भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जाचक अटी व वाढीव शुल्कांमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील १५०० उद्योगांसह राज्यातील १०,००० उद्योगांवर परिणाम झाला असल्यामुळे राज्याचे वार्षिक ५००० ते ९००० कोटी रूपयांचे नुकसान होत असून, उद्योगांच्या वीज बिलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने काही उद्योग राज्याबाहेर स्थलांतरित होण्याची शक्यता निर्माण झाली असून त्यामुळे बेरोजगारी वाढणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच ग्रीड सपोर्ट चार्ज रद्द करणे, नेट मीटरिंग प्रणाली पूर्ववत करणे, रात्रीच्या सौर वीज वापरास परवानगी देणे, वाढीव वीज विक्री कर मागे घेणे व सौरऊर्जा ग्राहकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) विद्युत अधिनियम, २००३ नुसार मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचा अधिकार आहे. मा.आयोगाच्या नेट मीटरिंग विनियमांतील तरतुदीनुसार मा.आयोगाने सौर वापरकर्त्यांमुळे महावितरणच्या इतर ग्राहकांवर वाढणारा आर्थिक भार लक्षात घेऊन ग्रीड सपोर्ट चार्ज लागु केला आहे आणि सौर ऊर्जा स्वस्त व दिवसा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने त्याचा फायदा ग्राहकांना देण्यासाठी मा.आयोगाने TOD वीज दराची पूर्नरचना केली आहे.

मा.आयोगाने दिनांक २५ मार्च, २०२६ पासून महावितरणकडील सर्व वर्गवारीतील ग्राहकांसाठी सरासरी वीजदारात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२६-२७ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत घट मंजूर केली आहे.

वाढीव अतिरिक्त वीज विक्रीकराच्या माध्यमातून जमा होणारा निधी प्रधानमंत्री कूसूम घटक-ब योजनेंतर्गत आस्थापित करण्यात येणाऱ्या सौर कृषीपंपांकरीता वापरण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तसेच, सद्य:स्थितीत बिहाइंड द मीटर ग्राहकांवर त्यांनी स्वत: निर्मिती करून स्वत:साठी वापरलेल्या युनिट्सवर कोणतेही शुल्क लावण्यात येत नाही.
(३) हे खरे नाही.

मागील वर्षांतील वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, जर महावितरणने "प्रचलित व्यवसाय (Business as Usual)" पध्दती अवलंबली असती, तर सध्याचा रू ९.४५ प्रति युनिट (२०२४-२५) इतका सरासरी वीज पुरवठा दर आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रुपये १०.३२ प्रति युनिटपर्यंत व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये रुपये १४.६७ प्रति युनिट इतका झाला असता.परंतु महावितरणने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ आगामी पाच वर्षासाठी महावितरण मधील वीज ग्राहकांना देऊन वीज दरात कपात प्रस्तावित केली. सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.आयोगाने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजीच्या वीज दर आदेशाद्वारे औद्योगिक उच्चदाब व लघुदाब वर्गवारी साठी सन २०२४-२५ च्या तुलनेत २०२६-२७ ते २०२९-३० पर्यंत अनुक्रमे २ ते ८ टक्के व १ ते ३ टक्के इतकी सरासरी वीजदर कपात मंजूर केली आहे. महावितरण क्षेत्रात मागील ३ वर्षात औद्योगिक ग्राहकांच्या संख्येत ८% ने वाढ झाली असून त्यांच्या वीज वापरात २०% ने वाढ झाली आहे.

त्यातील पुणे परिमंडल अंतर्गत मागील ३ वर्षात औद्योगिक ग्राहकांच्या संख्येत ११% ने वाढ झाली असून त्यांच्या वीज वापरात २५% ने वाढ झाली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील वीजेचे भारनियमन बंद करण्याबाबत

**(२) * ९३३० श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी दररोज सायंकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत वारंवार वीजेचे भारनियमन करण्यात येत असल्यामुळे ग्रामीण जनजीवन विस्कळीत झाले असल्याची बाब माहे एप्रिल-मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भारनियमनामुळे शेतकरी, पशुपालक, कुक्कुटपालन व्यावसायिक आणि विशेषतः रात्रीच्या वेळी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असून भारनियमनच्या काळात प्रकाश व्यवस्थेसाठी पूर्वी वापरल्या जाणाऱ्या रॉकेलचे वितरण बंद किंवा अत्यंत मर्यादित असल्याने ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना अंधारात राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील वीजेचे भारनियमन तात्काळ बंद करून नागरिकांना अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच वाढती वीजेची मागणी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त वीज खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

माहे एप्रिल व मे २०२६ मध्ये महावितरण करारीत केलेल्या महानिर्मितीच्या औष्णिक केंद्रामधील काही विद्युत संच अचानक तांत्रिक कारणास्तव बंद पडल्याकारणाने व चालू असलेल्या विद्युत संचामधून कमी वीज उपलब्ध होत असल्यामुळे वीजेची उपलब्धता कमी झाल्याने वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र यांच्या निर्देशानुसार राज्यात काही भागामध्ये अल्पशा कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले होते.
(२) मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे दाखल जनहित याचिका क्र.१६/२०१४ मध्ये मा. न्यायालयाने दि. ०७.०१.२०१६ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन राज्यभरात अत्यंत मर्यादित स्वरुपात केरोसीनचे वितरण करण्यात येते. तथापि, सद्यस्थितीत भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजीला पर्यायी इंधन म्हणून तात्पुरता स्वरुपात केरोसीन वितरण करण्याकरिता शासनाने दि. २५.०३.२०२६ रोजी आदेश पारित केले आहे.
(३) राज्यात कुठेही भारनियमन करण्यात येत नाही. मात्र, अपवादात्मक स्थितीत तांत्रिक कारणास्तव अल्पकाळासाठी वीज प्रणालीच्या सुरेक्षेसाठी काही भागातील वीज पुरवठा खंडीत करण्यात येतो. राज्यातील वीजेच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी महावितरण कंपनीकडून मध्यम कालीन निविदेव्दारे

९९३ मे.वॅ. क्षमतेसाठी पुढील ५ वर्षासाठी वीज खरेदी करार करण्यात आलेले आहे आणि एप्रिल व मे २०२६ या महिन्याकरीता लघुकालीन निविदेद्वारे ६७० मे.वॅ. इतकी वीज खरेदी करण्यात आली आहे. तसेच, इतर राज्यांसोबत वीजेच्या बँकिंग कराराद्वारे ८८६ मे.वॅ. वीजेचे नियोजन करण्यात आले होते. तसेच, भविष्यातील वीजेच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी दीर्घकालीन मागणी संसाधन पर्याप्तता योजना (Long term Distribution Resource Adequacy Plan) नूसार पुढील पाच वर्षाकरीता ४३,८७० मे.वॅ. वीज खरेदी करार करण्यात आलेले आहे व ही वीज क्षमता टप्प्याटप्याने स्थापित होऊन वर्ष २०३१-३२ अखेर महावितरणची वीज निर्मिती स्थापित क्षमता ७८५९१ मे. वॅ. इतकी होणार असून त्याव्दारे भविष्यातील वीजेची मागणी पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील टीसीएस कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक व मानसिक शोषण केल्याबाबत

**(३) * ९५४१ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमित गोरखे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वडाळा परिसरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, अश्लील शेरेबाजी, विनयभंग, मानसिक छळ केल्याचे तसेच धार्मिक भावना दुखावल्याचा अत्यंत गंभीर प्रकार उघडकीस आला असून, सदर प्रकरणी सहा जणांना अटक केल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकाराबाबत पीडीत महिला कर्मचाऱ्यांनी पुणे येथील कंपनीच्या मुख्य कार्यालयातील एचआर विभागाकडे वेळोवेळी ई-मेलद्वारे तक्रारी नोंदवून देखील सदर तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले तसेच नाशिक येथील टीसीएस कंपनीतील महिलांचे मानसिक व लैगिंक शोषण करणाऱ्या संबंधित गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे व या गंभीर घटनेच्या अनुषंगाने राज्यातील मल्टिनॅशनल आयटी कंपन्याची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक शहरामधील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचे विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न व धार्मिक भावना दुखावल्याची बाब निदर्शनास आली असून या प्रकरणी पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणातील पीडित महिला कर्मचाऱ्याने आरोपीकडून होत असलेल्या त्रासाबाबत पुणे येथील कंपनीच्या मुख्य कार्यालयातील ऑपरेशन मॅनेजर यांच्याकडे तोंडी तक्रार करून देखील तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबत दाखल गुन्ह्यात संबंधित ऑपरेशन मॅनेजर यांना आरोपी करून अटक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत देवळाली कॅम्प पोलीस ठाणे व मुंबईनाका पोलीस ठाणे येथे दाखल एकूण ९ गुन्हयांच्या तपासाकरीता विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाडा विभागात सौर कृषी पंप बसविण्यासंदर्भात धोरण ठरविण्याबाबत

**(४) * ९१८३ श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाडा विभागातील अनेक भागांमध्ये भूजल पातळी ७०० ते ८०० फूट पेक्षा अधिक खोल गेली असून, तेथे बसविण्यात आलेले सौर कृषी पंप अत्यंत कमी क्षमतेचे असून काही ठिकाणी ते पुर्णपणे बंद (निकामी) अवस्थेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सौर कृषी पंप योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सौर पंप स्वीकारण्यासाठी अप्रत्यक्ष दबाव टाकण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, दुर्गम/अतिखोल भूजल पातळीच्या भागांमध्ये सौर कृषी पंप बसविण्यापूर्वी विहीर/बोअरवेलची खोली, भूजल पातळी व पाण्याची उपलब्धता याबाबत तपासणी करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या भागांमध्ये सौर कृषी पंप तांत्रिक व व्यावहारिकदृष्ट्या कार्यक्षम ठरत नाहीत अशा ठिकाणी शेतकऱ्यांना पारंपरिक वीज वितरण प्रणालीद्वारे नियमित वीज जोडणी देऊन सिंचनाचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी विभागनिहाय स्वतंत्र धोरण तयार करून ज्या भागांत सौर पंप सुस्थितीत नाहीत तेथे त्याची सक्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) सौर कृषी पंप बसवण्यापूर्वी संयुक्त तपासणी करण्यात येऊन पाण्याच्या पातळीनुसार योग्य हेड चा पंप व तांत्रिक बाबी तपासून घेणे ही जबाबदारी संबंधित पुरवठादारांची असते. तसेच शेतकऱ्यांना सौर पंप आस्थापित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते व यासाठी कुठलाही दबाव टाकला जात नाही.

(३) व (४) राज्यातील सर्व भागामध्ये सौरपंप आस्थापित केलेले असून ज्या भागामध्ये तांत्रिक अडचणी किंवा आव्हाने आल्यास त्यावर महावितरणने मात करुन बुस्टर पध्दतीने, मोनोपोल उभारुन, कॅनलवर सौर पंप आस्थापित करुन, तरंगते सौरपंप आस्थापित करुन शेतीला पाणीपुरवठा केलेला आहे. तसेच हरीत ऊर्जा व्दारे दिवसा पाणीपुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव येथील नेस्को सेंटरमधील कार्यक्रमात अंमली पदार्थाच्या सेवनामुळे दोघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(५) * ९६५२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.कृपाल तुमाने, श्री.पंकज भुजबळ, श्री.सचिन अहिर, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंमली पदार्थांची विक्री व सेवनाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, टिटवाळा येथील ड्रग्ज पार्टी तसेच मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये संगीत कार्यक्रमाच्या नावाखाली आयोजित केलेल्या रेव्ह पार्टीमध्ये अंमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे एमबीएचे दोन विद्यार्थी मृत्यूमुखी व एक तरुणी गंभीर झाल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत आयोजित करण्यात येणाऱ्या मोठ्या संगीत कार्यक्रम, कॉन्सर्ट व रेव्ह पार्टींमध्ये अंमली पदार्थांचे सेवन व विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याचे आढळून आले असून, नेस्को सेंटरमधील कार्यक्रमात बिल्डरने कुरिअरच्या माध्यमातून एमडी (MD) व एमडीएमए (MDMA) या अंमली पदार्थांचा पुरवठा करण्यात आल्याचे तसेच हजारो विद्यार्थ्यांना लाखो रुपयांची तिकीटे १६०० ते २००० रुपयात विकून अंमली पदार्थांची विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नेस्को ड्रग्ज प्रकरणात उपचार घेत असलेल्या तरुण–तरुणींनी यापूर्वीच्या जिओ वर्ल्डच्या इव्हेंटमध्ये देखील ड्रग्ज घेतल्याचे आढळून आले असून गोरेगाव ड्रग्स पार्टी प्रकरणात मृत्यूमुखी पडलेल्या तरुणींच्या कुटुंबीयांनी आयोजकांनी संबंधित पार्टीमध्ये अवैधरित्या अंमली पदार्थांचा पुरवठा केल्याचा आरोप केला आहे तसेच मानखुर्द येथे देखील अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या नागरिकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नेस्को ड्रग्ज प्रकरणात व तत्सम इतर कार्यक्रमांमध्ये अंमली पदार्थ पुरवठा करणाऱ्या आरोपी, आयोजक व संबंधित व्यक्तींविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले काय व किती आरोपींना अटक करण्यात आली आहे, तसेच मुंबईत आयोजित करण्यात येणाऱ्या मोठ्या रेव्ह पार्टी, कॉन्सर्ट व इव्हेंटमध्ये अंमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी अशा कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच तरुणांना अंमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ११/०४/२०२६ रोजी नेस्को प्रदर्शन केंद्र, नेस्को हॉल क्र.०५, गोरेगाव (पुर्व), मुंबई या ठिकाणी आयोजीत केलेल्या म्युजिक कॉन्सर्ट शो मध्ये अंमली पदार्थाच्या सेवनामुळे एका २४ वर्षीय तरुणीचा व २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू, २५ वर्षा खालील व्यक्तींना दारु देणे तसेच पोलीसांच्या परवानगी पेक्षा जास्त वेळ कार्यक्रम चालू ठेवल्याबाबत सदर कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थ पुरवणाऱ्या एका व्यक्तीवर,नेस्को कार्यक्रमाचे आयोजक, इव्हेंट ऑर्गनाजर व त्यांचे साथीदार यांच्याविरुध्द वनराई पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२२८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०५, १२५, १२५(ब), २२३(ब), ३(५), महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ सह एनडीपीएस कायदा कलम ८(क), २२, २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच टिटवाळा येथील ड्रग्ज पार्टी बाबत गुन्हा नोंद नाही.

(२) सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी खुलेआम अंमली पदार्थाचे सेवन विक्री होत असल्याचे तपासात आढळून आलेले नाही.

नेस्को सेंटरमधील कार्यक्रमात बिल्डरने कुरिअरच्या माध्यमातून एमडी (MD) व एमडीएमए (MDMA) या अंमली पदार्थाचा पुरवठा करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही.

तथापि, सदर गुन्ह्यातील अटक आरोपी याने कुरिअर मार्फत अंमली पदार्थ मागवून ते इतर अटक आरोपी यांच्या मार्फत मयत विद्यार्थ्यांना दिले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

तसेच लाखो रुपयांची तिकीटे हजारो विद्यार्थ्यांना १६०० ते २००० रुपयात विकून नंतर त्यांना अंमली पदार्थांची सर्रास विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) उपरोक्त नमूद गुन्ह्यात अंमली पदार्थ पुरवणारा व्यक्ती, नेस्को कार्यक्रमाचे आयोजक, इव्हेंट ऑर्गनाजर व त्यांचे साथीदार असे एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत ३ आरोपी जामिनावर आहेत.

नेस्को सेंटर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या तत्सम इतर कार्यक्रमांमध्ये अंमली पदार्थाचा पुरवठा, सेवन अथवा त्यासंबंधित कोणत्याही बेकायदेशीर कृत्यांबाबत वनराई पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर यापुर्वी कोणतीही तक्रार प्राप्त/गुन्हा नोंद झालेला नाही.

नेस्को ड्रग्ज प्रकरणात उपचार घेत असलेल्या तरुणीने यापूर्वीच्या जिओ वर्ल्डच्या इव्हेंटमध्ये देखील ड्रग्ज घेतल्या प्रकरणी गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

मुंबई शहरामधील मानखुर्द परिसरात सन जानेवारी २०२५ ते मे २०२६ पर्यंत अंमली पदार्थ जवळ बाळगल्या संदर्भात एकूण ३६ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ६० आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुध्द एकूण १०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी नेस्को सेंटर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मोठ्या कार्यक्रामांदरम्यान पोलीस बंदोबस्त, साध्या वेशातील अधिकारी व अमंलदारांची नियुक्ती, संशयित व्यक्तींवर देखरेख तसेच आवश्यकतेनुसार तपासणी व गुप्त माहिती संकलन या सारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

मुंबई शहरात “ड्रग्ज फ्री मुंबई” अभियान राबवून अंमली पदार्थाचे सेवनाचे परिणांमाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम, सामुहिक शपथ कार्यक्रम, पथनाटय, आर्ट्स फेस्टीव्हल, मॅरेथॉनमध्ये सहभागी होवून, वाहन रॅली, बॅनर / हॅण्डबिल पत्रके वाटप करून, पोलीस ठाणे हद्दीतून रॅलीचे आयोजन करण्यात येते.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष येथे इन्फोलाईन नं.९८१९१११२२२ व १९३३ या हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित असून नमुद हेल्पलाईन क्रमांकावर ड्रग्स विक्रेत्याबाबत माहिती प्राप्त झाल्यास कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी व राजापूर तालुक्यातील प्राचीन कातळशिल्पांचे संवर्धन करण्याबाबत

**(६) * ८६७४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी आणि राजापूर तालुक्यातील साधारणतः १०,००० ते ४५,००० वर्षांपुर्वीची (मध्य अश्मयुगीन काळातील) कातळशिल्पे अत्यंत प्राचीन व रहस्यमयी असल्याने जागतिक स्तरावरील दुर्मिळ वारसा मानली जात असून, हजारो वर्षांपुर्वीची ही शिल्पे योग्य संरक्षणाअभावी दुर्लक्षित राहिल्याने त्यांची सांस्कृतिक हानी होत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी, राजापूर आणि लांजा तालुक्यात २८० हून अधिक ठिकाणी अशी कातळशिल्पे विखुरलेली असून, त्यामध्ये मासे, प्राणी, पक्षी आणि गूढ मानवी आकृत्या कोरलेल्या आहेत, परंतु सध्या वाढते शहरीकरण, खाणकाम आणि नैसर्गिक कारणांमुळे त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्राचीन कातळशिल्पांचे राज्य शासनाच्या पुरातत्व विभागामार्फत जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच या स्थळांना जागतिक वारसा स्थळांच्या (UNESCO World Heritage Sites) यादीत समाविष्ट करण्याबाबत व या स्थळांच्या संरक्षणासाठी स्थानिक स्तरावर 'हेरिटेज झोन' घोषित करणे, संरक्षक कुंपण घालणे आणि पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शासनाने निधी मंजूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

कोकणातील कातळांवर कोरलेल्या प्राचीन कलाकृतींना कातळशिल्प म्हटले जाते. ही कातळशिल्पे प्रामुख्याने रत्नगिरी, सिंधुदुर्ग आणि गोवा या परिसरात मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. आजपर्यंत सुमारे १०० हून अधिक स्थळांवर १५०० पेक्षा अधिक कातळशिल्पांची नोंद करण्यात आलेली आहे. देऊड, कशेळी, चवे, भगवतीनगर, कापडगाव, देवीहसोळ, बारसू, उक्षी येथील कातळशिल्प या राज्य संरक्षित स्मारकांवर व इतर ०९ असंरक्षित अश्या एकूण १७ स्मारकांच्या स्थळांवर संरक्षणभिंती, पोहोच मार्ग, दिशादर्शक फलक (Signages), माहिती केंद्रे व स्वच्छतागृहे उभारण्याच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून त्यासाठी ४.३२ कोटी इतका निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील महत्वाच्या नऊ कातळशिल्पांच्या स्थळांना राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आले आहे. कोकणातील कातळशिल्पे ही जागतिक वारसा यादीत समाविष्ट व्हावित या उद्देशाने महाराष्ट्रातील ०८ व गोवा राज्यातील ०१ अशा एकूण ०९ निवडक महत्वाच्या स्थळांचा प्रस्ताव तयार

करुन युनेस्कोकडे सादर करण्यात आला असून त्यांचा समावेश युनेस्कोच्या Tentative List मध्ये करण्यात आला आहे. तसेच, सदर नामांकनाचा प्राथमिक मुल्यांकन अहवाल (Preliminary Assessment Report) म्हणजेच, अंतिम प्रस्ताव दाखल करण्याआधीचा महत्वाचा टप्पा पूर्ण करण्यात आला असून माहे जून, २०२६ च्या अखेरीस केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

प्राचीन कातळशिल्पांच्या संवर्धनासाठी सुरुवातीच्या टप्प्यात १७ महत्वाच्या स्थळांवर संरक्षणभिंती, पोहोच मार्ग, दिशादर्शक फलक (Signages), माहिती केंद्रे व स्वच्छतागृहे उभारण्याच्या प्रकल्पास दिनांक २७/१२/२०२१ रोजीच्या शासन निणर्यान्वये मान्यता देण्यात आली असून त्यासाठी रुपये ४.३२ कोटी इतका निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. यापैकी चार स्थळांवरील संरक्षणात्मक कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ठिकाणी जागामालकांची संमती मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक १२/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोकणातील कातळशिल्पांचे संशोधन, संवर्धन, व्यवस्थापनाबाबत तसेच, नवीन स्थळांचा शोध घेणे या उद्देशांसह वर्ल्ड हेरिटेज डेस्क स्थापन करण्यासाठी येणाऱ्या रुपये १४.६२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

कोकणातील कातळशिल्पांचे वेगवेगळ्या अंतरांमधून सुक्ष्म दृष्टीने, सर्व हवामानामध्ये दृकश्राव्य चित्रिकरण होणे गरजेचे आहे. या करीता सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ०७/०४/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कातळशिल्पांचे स्थळ निरीक्षण करुन स्थानिक लोकांच्या जीवनमानात त्याचे असणारे महत्व, त्यांच्या दंतकथा यांचे दस्तऐवजीकरण करुन कातळशिल्पांवर आधारीत आंतरराष्ट्रीय दर्जाचा माहीतीपट बनविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे हरताळा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे खाणपट्ट्यास मंजूरी देताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(७) * ९४८१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हरताळा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट क्र. २७८/२ मधील खाणपट्ट्यास मंजुरी देताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे व अंतराच्या अटींचे उल्लंघन झाले असून, मंजूर अक्षांश-रेखांश सोडून अन्य ठिकाणी अवैध उत्खनन होत असल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी मा.पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित स्थळाची प्रत्यक्ष पाहणी व तांत्रिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करून सदर स्टोन क्रशरचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप-प्रादेशिक कार्यालय, जळगांव यांनी दिनांक १६/०४/२०२६ रोजी मौजे हरताळा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट क्र. २७८/२ या गटाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असून, सदर पाहणी दरम्यान गौण खनिज उत्खनन केलेले असून त्या ठिकाणी कोणतेही खडी मशीन (स्टोन क्रशर) असल्याचे आढळून आलेले नाही.

प्रश्नामध्ये विचाराधीन खाणपट्टयासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आली आहे. सदर खाणपट्याच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांच्या दिनांक १५/१२/२०२२ रोजीच्या अहवालान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील येत असलेल्या प्रामा / रामा / प्रजिमा पैकी कोणताही रस्ता जात नसल्याने निरंक अभिप्राय कळविले असलेबाबतचा अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी, जळगाव यांनी सादर केला आहे.

तहसिलदार मुक्ताईनगर यांच्या दिनांक २७/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मुक्ताईनगर तालुक्यातील खाणकाम योजनेत समाविष्ट खाणपट्टयामध्ये असलेल्या गटांची ईटीएस मोजणी करणेबाबत उप संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील कोराडी औष्णिक वीज केंद्रात झालेल्या अपघातात अभियंते व कामगार गंभीर जखमी झाल्याबाबत

**(८) * ९५०२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कोराडी औष्णिक वीज केंद्रातील ६६० मेगावॅट क्षमता असलेल्या संच क्रमांक १० मध्ये देखभाल-दुरुस्तीचे काम सुरू असताना अचानक बॉयलरच्या ‘पिप होल’मधून अत्यंत गरम वाफ उसळून भीषण अपघात झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातात महानिर्मितीचे अधिकारी/अभियंते व कंत्राटी कामगारांसह एकूण ८ जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत, तसेच या अपघातामुळे औष्णिक वीज केंद्राच्या तांत्रिक सुरक्षेचा आणि वारंवार होणाऱ्या अपघातांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघाताची सुरक्षा विभागामार्फत करण्यात येत असलेल्या ‘सेफ्टी ऑडिट’चा (Safety Audit) प्राथमिक निष्कर्ष काय आहे तसेच या अपघातातील गंभीर व इतर जखमी कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून कोणती तात्काळ आर्थिक मदत व वैद्यकीय उपचार सुविधा पुरविण्यात आली आहे व पुरविण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय,कोराडी औष्णिक वीज केंद्र ६६० मेगावॅट संच क्र. १० बंद असताना दिनांक १३/०४/२०२६ रोजी क्लिंकर पाडत असताना बॉयलर मधील पिप होल मधून गरम वाफ बाहेर आल्याने ८ जणांना दुखापत झाली.

(२) सदर अपघातात ८ जण जखमी झाले असून, त्यापैकी ४ जण महानिर्मितीचे अधिकारी/कर्मचारी व ४ जण कंत्राटी कामगार आहेत. सर्व जखमींना तात्काळ जवळच्या मॅक्स मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल, नागपुर येथे दाखल करण्यात आले व आवश्यक उपचारानंतर सर्व जखमींना रूग्णालयातून सोडून देण्यात आले आहे.

सदर कर्मचाऱ्यांनी काम करत असताना सेफ्टी शूज, सेफ्टी गॉगल्स, सेफ्टी हेल्मेट परिधान केलेले होते. परंतु क्लीन्कर पाडत असताना अचानक राखेची गरम वाफ पीप होल मधून बाहेर आल्याने सदरची घटना घडली.

तथापि, सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता संचाच्या पिप होल जवळ संच बंद असताना देखील काम करत असताना अतिरिक्त विशेष सुरक्षा खबरदारी बाळगण्यासाठी फेस शिल्ड, बॉयलर सूट, मास्क इत्यादी चा वापर करणे आणि SOP चे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) सदर अपघाताचे सुरक्षा विभागामार्फत करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिट नुसार सुरक्षा नियमांचे कोणतेही उल्लंघन झाल्याचे आढळून आलेले नाही. जखमी कंत्राटी कामगार कर्मचारी हे राज्य विमा योजनेचे लाभार्थी असून सदर कंत्राटी कामगारांना विशेष उपचार मिळण्याकरीता महानिर्मिती कोराडी औष्णिक विद्युत केंद्राद्वारे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच कर्मचारी राज्य विमा योजनेंतर्गत आर्थिक लाभ व इतर सुविधा सदर कंत्राटी कामगारांना अदा करण्यात येईल.

(४) सदर संपूर्ण प्रक्रिया विनाविलंब पार पाडण्यात आली.

-----------------

## कल्याण - मुरबाड महामार्गावर रायते येथे अवैधरित्या प्रवासी वाहतुकीमुळे झालेल्या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याबाबत

**(९) * ९४८४ श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-मुरबाड महामार्गावर उल्हास नदीवरील रायते पुलाजवळ दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी इको वाहनातून अवैधरित्या प्रवासी वाहतूक करित असताना झालेल्या भीषण अपघातामध्ये चालकासह ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची गंभीर बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण (पश्चिम) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरातून मुरबाडकडे धावणारी अनेक सहा-आसनी वाहने मुदत संपल्यानंतरही भंगारात न काढता अवैधरित्या प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात परिवहन विभागामार्फत कारवाई करण्याबाबत तसेच अवैध प्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद करून अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी आणि सदर अपघातातील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) कल्याण-मुरबाड महामार्गावरील उल्हास नदीवरील रायते येथील नवीन पुलावर प्रवासी वाहतूक करणारे इको वाहन आणि मिक्सर यांच्यात धडक होऊन अपघात झाला आहे. सदर अपघातामध्ये व्हॅनमधील ११ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.

रायते येथील नवीन पुलाचे काम सुरु असून पुलावरील दोन मार्गिकेपैकी एक मार्गिका बॅरीकेडस् लावून बंद करण्यात आली होती. दुसऱ्या मार्गिकेवर दोन्ही बाजूची वाहतूक सुरू ठेवण्यात आली होती. वाहनाचा अतिवेग, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटणे व एकाच मार्गिकेत वाहतूक सुरू असल्याने सदर अपघात झाला आहे. या अपघाताच्या अनुषंगाने कल्याण तालुका पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) कल्याण-मुरबाड मार्गावर काळी-पिवळी मिटर टॅक्सी, गामा जीप यांची दैनंदिन तपासणी करण्यात येते. ज्या वाहनांचे आयुर्मान संपुष्टात आले आहे, ज्या वाहनांच्या कागदपत्रांची वैधता संपली आहे, अशा दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. तसेच दोषी वाहनांना नोटीस बजावण्यात आली असून १३३ वाहने निष्कासित करण्यात आली आहेत. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत नियमित कारवाई करण्यात येत आहे.

सदर अपघातामध्ये मयत झालेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांना पंतप्रधान सहाय्यता निधी व मुख्यमंत्री सहाय्यता निधी यामधून मदत मिळण्याकरीता आवश्यक कार्यवाही सुरु असून वारसांबाबतची माहिती विहित नमुन्यामध्ये तहसिलदार, कल्याण यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य मुलांच्या शाळेत प्रवेश देण्याच्या निर्णयाबाबत

**(१०) * ९२६१ श्री.संजय खोडके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सुनिल शिंदे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाने दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षापासून दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे राज्यातील १९८ विशेष शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या सुमारे १० हजार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष शाळांमध्ये फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, समुपदेशन, विशेष अध्यापन पध्दती तसेच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विविध सहाय्यक सुविधा उपलब्ध असताना, बहुतांश सर्वसामान्य शाळांमध्ये अशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे समावेशक शिक्षणाच्या निर्णयामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व मानसिक भविष्य धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेष शाळांमध्ये सेरेब्रल पाल्सी, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, स्पायना बिफिडा, पोलिओ आदी आजारांनी ग्रस्त विद्यार्थ्यांसाठी जिने चढणे, हालचाल करणे व दैनंदिन शैक्षणिक उपक्रमांसाठी सहाय्यक कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले असताना, बहुतांश सर्वसामान्य शाळांमध्ये अशा सुविधा व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याच्या निर्णयाबाबत तसेच, दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक, थेरपी सुविधा व सहाय्यक कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम १६ व १७ मधील सर्वसमावेशी शिक्षणासंदर्भातील तरतूदी विचारात घेता विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अस्थिव्यंग प्रवर्गाच्या उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे reasonable accomodation उपलब्ध असल्याची खातरजमा करुन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रापासून नजीकच्या सर्वसाधारण शाळेत समायोजन करावे, असे जिल्हा कार्यालयांना दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.४१४०/२०२६ मधील दिनांक ०२ एप्रिल, २०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर पत्राला स्थगिती देण्यात आलेली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशांस अनुसरुन अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणतीही एकतर्फी कार्यवाही करण्यात येत नाही.

दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसमावेशी शिक्षण उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने नियोजन आराखडा निश्चित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सीमा तपासणी नाक्यांवर करण्यात येणाऱ्या अवैध वसुलीची चौकशी करण्याबाबत

**(११) * ९१५५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील आरटीओ चेकपोस्टवर संघटीत वसुली रॅकेट सक्रिय असून, त्यास विरोध करणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांना लक्ष्य केले जात असल्याची लेखी तक्रार मोटार वाहन निरीक्षकांनी माहे एप्रिल २०२६ मध्ये वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील विविध सीमा तपासणी नाक्यांवर अवैध वसुली करणे, बदल्यांसाठी आर्थिक देवाणघेवाण करणे आणि या गैरप्रकाराला विरोध करणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना खोट्या प्रकरणांत अडकवून त्यांच्या सेवापुस्तिकेवर परिणाम होईल असे कृत्य केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणामुळे प्रशासकीय यंत्रणेत भ्रष्टाचार होऊन राज्याच्या परिवहन विभागाच्या अधिकृत महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून संबंधित मोटार वाहन निरीक्षकांनी केलेल्या तक्रारींची शासनाने दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व सीमा तपासणी नाक्यांवरील मानवी हस्तक्षेप कमी

करण्यासाठी व पारदर्शकता आणण्यासाठी 'फास्टॅग' (FASTag), 'वाहन' (VAHAN) आणि 'ई-वे बिल' (e-Way Bill) प्रणालीची पुर्णत: अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) अशा आशयाची दिनांक २५/०५/२०२६ रोजीची तक्रार प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) यांच्याकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रार त्यांनी दिनांक ०४/०६/२०२६ रोजी परिवहन आयुक्त कार्यालयाकडे पाठविली आहे.

परराज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रवेश करणाऱ्या वाहनांची तपासणी करुन दोषी वाहनांवर केंद्रिय मोटार वाहन कायदा, १९८८ प्रमाणे कारवाई करण्यात येते. तपासणी दरम्यान वाहन कर, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, ओव्हरलोड, इ. कागदपत्रांची तपासणी केली जाते. तपासणीअंती दोषी आढळणाऱ्या वाहनांना ई-चलान प्रणालीद्वारे चलान जारी करण्यात येते.

राज्यातील सर्व सीमा तपासणी नाक्यांवर फास्टॅग (FASTag) द्वारे सेवाशुल्क वसुली करण्यात येते. तसेच सीमा तपासणी नाक्यांवरील अन्य सेवांचे सुलभीकरण करण्याकरीता वाहनांची संबंधित माहिती त्वरीत प्राप्त व्हावी यासाठी या सेवांची सांगड (Integration) "वाहन ४.०" या प्रणालीशी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपदानाची रक्कम विहीत मुदतीत अदा न केल्याबाबत

**(१२) * ८९२४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांची उपदानाची रक्कम विहित मुदतीत अदा न केल्यामुळे, गत दोन वर्षांत सुमारे ४८० निवृत्त कर्मचाऱ्यांना न्यायालयीन आदेशानुसार सुमारे अडीच कोटी रुपये व्याज स्वरूपात द्यावे लागले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या तिजोरीवर हा अडीच कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार केवळ संबंधित विभागाच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे पडला असून निवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे वेळेत न देऊन महामंडळाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारे व्याजापोटी होणारे महामंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्तीच्या दिवशीच सर्व लाभ अदा करणे तसेच एसटी कर्मचारी-अधिकाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी व उपदान अदा करण्यासाठी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास रुपये २२१४.४७ कोटी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक, रा.प.महामंडळ यांचेकडून विशेष लेखा परिक्षण सुरु आहे. तपासणीअंती दोषी कर्मचारी/अधिकारी यांचेवर रा.प.शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात येईल.

रा.प.महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती बिकट असल्याने भविष्य निर्वाह निधी, विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास माहे मे २०२६ अखेर रुपये २७३८.१२ कोटी प्रलंबित आहे. सदरची प्रलंबित रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत आहे. तथापि, कोणत्याही सेवानिवृत्त रा.प.कर्मचारी / अधिकारी यांची भविष्य निर्वाह निधी अथवा उपदान देणी प्रलंबित नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील भाईंदर (प) येथील प्रस्तावित बस स्थानकाचे काम प्रलंबितअसल्याबाबत

**(१३) * ९२६८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भाईंदर (पश्चिम) येथील प्रस्तावित अत्याधुनिक एसटी बस स्थानकाचे काम दीर्घकाळापासून प्रलंबित असून माहे डिसेंबर, २०२५ मध्ये कामाचा शुभारंभ होऊन पाच महिने उलटूनही प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाचे बांधकाम प्रलंबित असल्यामुळे भाईंदर येथून इतर शहरांना जोडणारी एसटी बस सेवा सध्या बंद करण्यात आली असून, परिणामी स्थानिक नागरिक, नोकरदार आणि विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत असल्यामुळे सदर काम तातडीने सुरू करण्यासाठी आणि बंद पडलेली बस सेवा पूर्ववत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी परिवहन मंत्री महोदयांकडे लेखी स्वरुपात निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाब अंमलात आणण्यासाठी एकात्मिक दळणवळण आराखड्यांतर्गत 'युनिफाईड मुंबई मेट्रोपॉलिटन ट्रान्सपोर्ट ॲथॉरिटी' (UMMTA) च्या माध्यमातून बसस्थानकाचा पुनर्विकास करण्याबाबत, तसेच प्रवाशांचे होणारे हाल थांबविण्यासाठी मुख्य डेपोचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी बस सेवा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) भाईंदर पश्चिम येथे रेल्वे स्थानकानजीक मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेल्या व्यवस्थेमार्फत रा.प.महामंडळाची बस सेवा सुरु आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार दापोली, कवळेमहाकाळ, श्रीवर्धन तसेच ठाणे शहर सदृश्य मार्गावर बस फेऱ्या सुरु आहेत.

तसेच भाईंदर येथील बसस्थानक रा.प.महामंडळाच्या सार्वजनिक खाजगी सहभागाअंतर्गत (PPP) करणे प्रस्तावित आहे.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये विशेषत: कुडवा (जि.गोंदिया) येथील मुलांच्या वसतिगृहांत सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१४) * ८६९७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडवा (जि.गोंदिया) येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मुलांचे वसतिगृहातील ७१ विद्यार्थ्यांना बोअरवेल कोरडी पडल्यामुळे भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी टंचाईमुळे विद्यार्थ्यांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून त्यांना स्वतः पैसे खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे, तसेच राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अन्य वसतिगृहांमध्येही पिण्याचे पाणी, शौचालयांची दुरवस्था, स्वच्छतेचा अभाव, सुरक्षिततेचा प्रश्न आणि अपुरे फर्निचर अशा विविध समस्या आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सर्व वसतिगृहांचे 'सुविधा ऑडिट' करून तेथील त्रुटी दूर करण्यासाठी व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत सुविधा विनाविलंब उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) अंशतः खरे आहे. सदर वसतिगृहामध्ये माहे एप्रिल, २०२६ मध्ये बोअरवेलचा विद्युत पंप अचानक बंद पडला होता. तथापि विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी सहायक संचालक, गोंदिया यांनी तात्काळ टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था केली. तसेच, पिण्याच्या पाण्याची देखील व्यवस्था वॉटर कॅन द्वारे करण्यात आली. त्यानंतर नवीन विद्युत पंप खरेदी करून बसविण्यात आला असून पाण्याचा पुरवठा नियमितपणे सुरू करण्यात आलेला आहे.

(३) राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सुरु असलेल्या वसतीगृहांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यां प्रवाशांकडून जादा भाडेदराची आकारणी करित असल्याबाबत

**(१५) * ९०६१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून सणांच्या व गर्दीच्या काळात प्रवाशांकडून तिकीट दरामध्ये दुप्पट-तिप्पट वाढ करून आर्थिक शोषण केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक, मुंबई-सोलापूर आदी प्रमुख महामार्गांवर आकारण्यात येणाऱ्या तिकीट दरांमध्ये मोठ्या प्रमाणात खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन विभागामार्फत खाजगी ट्रॅव्हल्सच्या भाडे दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सद्य:स्थितीत प्रगत यंत्रणा अस्तित्वात नसून प्रवाशांची आर्थिक लूट थांबविण्यासाठी दर नियमन, ऑनलाईन मॉनिटरिंग किंवा तक्रार निवारण यंत्रणा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांचे कमाल भाडे दर दिनांक २७/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति कि.मी. भाडेदराच्या ५०% पेक्षा अधिक भाडे (महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन भाडे + ५०% जादा भाडे) खाजगी बस वाहतूकदारांना आकारता येणार नाही. निर्धारित केलेल्या भाडेदरापेक्षा जादा भाडेदर आकारत असल्याचे आढळून आल्यास, अशा वाहतूकदारांविरुध्द मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते. जादा भाडे आकारणाऱ्या वाहन धारकांविरुध्द प्रादेशिक/ उप प्रादेशिक कार्यालयाकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकाद्वारे माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत विहित केलेल्या भाडेदरापेक्षा जादा भाडेदर आकारणाऱ्या तसेच इतर गुन्ह्यामध्ये दोषी आढळणाऱ्या खाजगी बसेसविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | कालावधी | तपासलेली वाहने | दोषी वाहने | एकूण दंड वसुल रुपये (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ | ४७१५६ | ८४८८ | ४२९.११ |
| २ | दिनांक ०१/०४/२०२६ ते दिनांक ३१/०५/२०२६ | ३९४८ | ६७० | ३२.०० |
| | एकूण | ५११०४ | ९१५८ | ४६१.११ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ’निरामय’ आरोग्य विमा योजनेतंर्गत विमा संरक्षणाची मर्यादा वाढविण्याबाबत

**(१६)** * **९१८७ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय न्यास कायद्यांतर्गत (National Trust Act) बौद्धिक अक्षमता, सेरेब्रल पाल्सी, ऑटिझम आणि बहुविकलांगता असलेल्या व्यक्तींसाठी निरामय आरोग्य विमा योजना राबविली जाते, ज्यामध्ये लाभार्थ्यांना वार्षिक रुपये १ लाख पर्यंतचे विमा संरक्षण मिळत असून ऑटिझम आणि सेरेब्रल पाल्सीग्रस्त व्यक्तींना दीर्घकालीन उपचारांची, विविध थेरपींची (Physio/Occupational Therapy) आणि महागड्या औषधोपचारांची आवश्यकता असते, परंतु सध्याच्या महागाईच्या काळात रुपये १ लाखाची मर्यादा अत्यंत अपुरी असल्याची पालक व तज्ज्ञांकडून निवेदने शासनास प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषतः ग्रामीण भागात या योजनेची पुरेशी माहिती नसल्यामुळे नोंदणीकृत अर्जांची संख्या अल्प असून जिल्हा व तालुका स्तरावर विशेष जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निरामय योजनेतील विमा संरक्षणाची मर्यादा वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत अथवा राज्य शासनाकडून अतिरिक्त निधी (Top-up) उपलब्ध करून देण्याबाबत व ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय न्यासमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या निरामय आरोग्य विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांचेस्तरावरुन सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) राष्ट्रीय न्यासाच्या निरामय आरोग्य विमा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी दारिद्र्य रेषेखालील (BPL) लाभार्थ्यांसाठी वार्षिक प्रीमियम रुपये २५० तर एपीएल / नॉन-बीपीएल (APL) लाभार्थ्यांसाठी वार्षिक प्रीमियम रुपये ५०० इतका आहे.

राज्यातील जिल्हा परिषदांमार्फत दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखीव असलेल्या ५% दिव्यांग निधीचा उपयोग करून राष्ट्रीय न्यासाच्या निरामय आरोग्य विमा योजनेंतर्गत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचा वार्षिक विमा प्रीमियम अदा करण्यात येतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल दिव्यांग व्यक्तींना कोणताही आर्थिक भार न पडता आरोग्य विमा संरक्षणाचा लाभ मिळतो.

राष्ट्रीय न्यासाच्या नोंदणीकृत संस्थेच्या स्वरूपात कार्यरत असलेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रांमार्फत (DDRC) निरामय आरोग्य विमा योजना राबविण्यात येते. सदर केंद्रांमार्फत पात्र दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करून त्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जुहू समुद्र किनाऱ्यावरील बोटींची तांत्रिक व परवाना तपासणी करण्याबाबत

**(१७) * ९६७५ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुहू समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचे आकर्षण असलेल्या साहसी वॉटर स्पोर्ट्स राईड्सच्या (उदा. स्की, बनाना बोट, स्पीड बोट) संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, वॉटर स्पोर्ट्स राईड्सच्या परवानाधारक व अनधिकृत ऑपरेटरकडून मोठ्या प्रमाणावर नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२६ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वॉटर स्पोर्ट्स ऑपरेटरनी समुद्रकिनाऱ्यावर अनधिकृतपणे किऑस्क उभारून, बोटी उभ्या करून आणि अँकर टाकून मोठा भाग व्यापल्यामुळे पर्यटकांना चालण्यास अडथळा निर्माण होत असून या ठिकाणी बोटींची अनियमित सुरक्षा तपासणी आणि अनियंत्रित वाढीमुळे सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे तसेच व्यावसायिकांमधील अंतर्गत वाद व परवाना नसलेल्या फोटोग्राफरकडून पर्यटकांवर होणारे हल्ले यामुळे कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांनी माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास संबंधित शासकीय यंत्रणांना सर्व बोटचालकांची कागदपत्रे व परवान्यांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व पोलीस प्रशासनाने अनधिकृत ऑपरेटरवर कोणती कारवाई केली तसेच पर्यटकांच्या सुरक्षेसाठी व बोटींची नियमित तांत्रिक व परवाना सुरक्षा तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) या विभागाकडे याबाबत कोणतेही नोंद आढळून येत नाही.

(४) व (५) दिनांक ०१/०४/२०२६ रोजी उपसंचालक पर्यटन, बंदर निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक जिल्हा पर्यटन अधिकारी यांनी संयुक्तरित्या स्थळ पाहणी केली. स्थळपाहणीच्या अनुषंगाने दिनांक ०७/०४/२०२६ रोजी सर्व साहसी उपक्रम धारकांना किनारपट्टीवर साठवून ठेवण्यात आलेले साहित्य बोटी, होड्या तात्काळ हलवण्याबाबत तसेच अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास परवाना रद्द करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच उपसंचालक पर्यटन यांना जुहू बीचची नियमित तपासणी करुन कारवाई करण्याबाबत कार्यवाही करत आहेत.

-----------------

## शासकीय विभागांची सायबर सुरक्षा मजबूत करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१८)** * **९६१८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय विभागांच्या डिजिटल प्रणालींमध्ये 'डेटा ब्रीच' होण्याचा धोका निर्माण झाला असल्याने शासकीय यंत्रणांवरील सायबर हल्ल्यांमुळे संवेदनशील माहिती लीक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, त्यामुळे तांत्रिक सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लघन व बेकायदा माहिती चोरी होण्याचा धोका वाढला असल्यामुळे सायबर सुरक्षेच्या दृष्टीने तांत्रिक तपासणी करण्याची गरज असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व राज्य शासकीय यंत्रणा लक्षात घेता उपलब्ध ऑडिट संस्थांची संख्या अपुरी असल्याने माहिती तंत्रज्ञान प्रणालींमधील सुरक्षा दोष ओळखण्याची आव्हाने निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासकीय विभागांची सायबर सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी ऑडिट संस्थांची संख्या वाढवून धोरणात्मक सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यातील विविध शासकीय विभाग, कार्यालये, महामंडळे, उपक्रम तसेच इतर सार्वजनिक संस्थांमध्ये माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाचा (ICT) वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

तथापि, सायबर सुरक्षेबाबत पुरेशी जागरूकता, तांत्रिक ज्ञान व सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींमुळे काही प्रणालींवर सायबर गुन्हेगारांकडून अनधिकृत प्रवेश, डेटा चोरी, मालवेअर अथवा रॅन्समवेअर हल्ल्यांचा धोका निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे सायबर सुरक्षेच्या दृष्टीने नियमित तांत्रिक तपासणी, सुरक्षा मूल्यमापन व सायबर सुरक्षा लेखापरीक्षण (Cyber Security Audit) करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सायबर अपराधांच्या वाढत्या धोक्याविरुध्द एकूण सायबर सुरक्षा स्थिती आणि नागरिकांची सुरक्षा सुधारण्याकरीता तसेच, सायबर सुरक्षा आणि सुरक्षित सायबर पध्दतींबद्दल सरकारी विभाग, सार्वजनिक आणि खाजगी संस्था आणि नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी "महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळ" स्थापन करण्यात आले आहे.
(३) शासनाच्या विविध विभागांच्या पायाभूत सुविधा/डेटा/प्रकल्पांचे सायबर धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळाकडून सर्व शासकीय विभाग, शासकीय कंपन्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सहकारी बँका आणि इतर शासकीय नियंत्रण असलेल्या संस्थांचे वर्षभरातून किमान एकदा सायबर सुरक्षा परीक्षण (ऑडिट) अनिवार्य करणे आवश्यक आहे.

तसेच इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभागामार्फत राज्यातील संवेदनशील पायाभूत सुविधा (क्रिटिकल इन्फ्रास्ट्रक्चर) यांचे निश्चितीकरण करण्यात येत आहे.

सदर आस्थापनांचे सायबर सुरक्षा ऑडिट या आर्थिक वर्षापासून (सन २०२६-२७) तसेच, इतर आस्थापनांचे सायबर सुरक्षा ऑडिट प्राधान्याने महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळामार्फत अनिवार्य पध्दतीने करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधनसामग्री घेण्यासाठी वित्तीय सहाय्य योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१९) * ९५२५ श्रीमती भावना गवळी :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी शासनामार्फत साधनसामग्री घेण्यासाठी वित्तीय सहाय्य योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेंतर्गत पात्र दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कौशल्याधारित व्यवसायासाठी आवश्यक यंत्रसामग्री व साहित्य खरेदीकरीता निश्चित मर्यादेपर्यंत आर्थिक अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत लाभार्थी निवडीचे निकष कोणते आहेत तसेच, निवड झालेल्या लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते काय, तसेच राज्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी सन २०२४ ते २०२६ या कालावधीत सदर योजनेसाठी किती अर्ज सादर केले, त्यापैकी किती अर्ज मंजूर करण्यात आले, किती लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला व त्यासाठी शासनामार्फत एकूण किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर योजना अस्तित्वात असूनही अनेक पात्र दिव्यांग व्यक्ती अद्याप लाभापासून वंचित असून सदर योजनेचा लाभ ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे तसेच योजनेचा व्यापक प्रसार करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे

"दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधनसामग्री (Toolkit) घेण्यासाठी वित्तीय सहाय्य" या नवीन योजनेस दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधनसामग्री घेण्याकरीता रुपये १५,०००/- इतके अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

(२) सदर योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी निकष पुढीलप्रमाणे आहेत:-

१. आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (UDID), दिव्यांगत्व प्रमाणपत्र.
२. लाभार्थ्याचे वय १८ ते ४५ या वयोगटातील असावे.
३. शासकीय प्रशिक्षण संस्था/शासनमान्य प्रशिक्षण संस्था अथवा दिव्यांग कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातून प्रशिक्षण घेतलेला दिव्यांग प्रशिक्षणार्थी या योजनेस पात्र असेल.
४. प्रशिक्षित दिव्यांग महिलांना प्राधान्य दिले जाईल.

निवड झालेल्या लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कडून थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे त्यांच्या बैंक खात्यात जमा करण्यात येते.

शासन निर्णय, दिनांक २०/१०/१९८७ अन्वये "दिव्यांग व्यक्तींना पुनर्वसनासाठी वित्तीय सहाय्य देणे." या योजनेद्वारे रुपये ५००/- व काही उद्योगधंद्याबाबत रुपये १०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येत होते. या योजनेंतर्गत दिले जाणारे अर्थसहाय्य अत्यल्प असल्यामुळे योजनेस लाभार्थ्यांचा प्रतिसाद मिळत नव्हता.

सदर योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये व वित्तीय सहाय्याच्या रकमेमध्ये दिनांक २८/०२/२०२६ व दिनांक ११/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सुधारित वित्तीय सहाय्याच्या रकमेमुळे सन २०२६-२७ मध्ये आजपोवेतो सदर योजनेंतर्गत प्राप्त अर्जांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ. क्र | सन | प्राप्त अर्ज | मंजूर अर्ज | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | २०२४-२५ | निरंक | निरंक | निरंक |
| २ | २०२५-२६ | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | २०२६-२७ | १५३५ | ३६ | ३६ |

(३) "दिव्यांग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी टूलकिट खरेदीस आर्थिक सहाय्य" ही योजना Divyang Sahayak Portal" या Online पोर्टलवर उपलब्ध आहे. तसेच सदर योजनेच्या माहिती व प्रसिद्धीकरीता दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे व जिल्हा स्तरावरील जिल्हा सक्षमीकरण कार्यालयांमार्फत स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक दुरचित्रवाणीवरील जाहिराती, भित्तीपत्रके, जाहिराती इ. मार्फत प्रसिद्धी दिली जाते. तसेच, आयोजित करण्यात आलेल्या शिबिरांमार्फतही योजनेची जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील सिडको कार्यालयातील तत्कालीन सहाय्यक वसाहत अधिकाऱ्याकडे ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता आढळून आल्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(२०)** * **९३४८ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील सिडको कार्यालयातील एका माजी सहाय्यक वसाहत अधिकाऱ्याने आपल्या अधिकृत उत्पन्नापेक्षा अधिक बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्याकडे त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा सुमारे १७३% अधिक म्हणजेच कोट्यवधी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता आढळून आली आहे, तसेच या प्रकरणाचा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) केलेल्या चौकशीचा सविस्तर तपशील काय आहे,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुध्द याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, तसेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेहिशेबी मालमत्ता जमा होईपर्यंत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याचे चौकशीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकांऱ्याचे निवृत्तीवेतन व इतर सर्व सेवानिवृत्तीचे लाभ तात्काळ बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) I. आलोसे, सहाय्यक विकास अधिकारी (सामान्य) हे पनवेल विभागीय वसाहत कार्यालय येथे कार्यरत असताना लाच मागणी प्रकरणी त्यांच्याविरुध्द खांदेश्वर पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.नं.२७१/२०१९, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ (अ), १२ प्रमाणे दिनांक ०२/१२/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये मा.विशेष न्यायालय, पनवेल येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून खटला न्यायप्रविष्ट आहे.

II. दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने आलोसे यांच्याविरुध्द ११/०२/२०२१ अन्वये मालमत्तेची उघड चौकशी सुरु करण्यात आली.

III. सदर उघड चौकशीअंती आलोसे, माजी सहाय्यक विकास अधिकारी (सामान्य), सिडको, यांनी त्यांचे सेवाकालावधीत गैरमार्गाने ज्ञात उत्पन्नापेक्षा रुपये १,९४,४७,९०५/- अधिक किंमतीची मालमत्ता स्वतःच्या व त्यांची पत्नीच्या नावे संपादित केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची अपसंपदा ही त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा १७३.३६% एवढी अधिक आहे.

(३) अपसंपदेच्या अनुषंगाने, आलोसे यांच्याविरुध्द खारघर पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.नं.१४७/२०२६, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम १३ (१)(ब) सह १३ (२) व कलम १२ प्रमाणे दिनांक ०२/०४/२०२६ रोजी अपसंपदेचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

(४) आलोसे यांनी सहायक कार्मिक अधिकारी (आस्था) म्हणून कार्यरत असताना बोगस कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व वेतन वितरणामध्ये बनावट कागदपत्राद्वारे सिडको महामंडळाची आर्थिक फसवणूक केली असून त्यानुषंगाने त्यांच्याविरुध्द सी.बी.डी बेलापूर येथे गु.र.क्र. ७५/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गंभीर गैरव्यवहाराच्या अनुषंगाने आलोसे यांना दिनांक ०१/०८/२०२४ रोजी सिडको सेवेतून बडतर्फ (Dismissed) करण्यात आले असून त्यांचे सर्व सेवा लाभ व सेवानिवृत्तीनंतर देय लाभ जप्त (Forfeited) करण्यात आले असून त्यांना कोणत्याही प्रकारचे लाभ व इतर देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांनी केलेल्या गैरव्यवहारांची चौकशी करणेबाबत

**(२१)** * ८९६० **ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी. महामंडळाचे महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांच्येकडून एस.टी. स्थानकांवरील व्यावसायिक आस्थापनांना (गाळे) मंजुरी देणे, राज्यातील विशिष्ट मोजक्याच हॉटेलांवर एस.टी. बसेस थांबविण्याची व्यवस्था करणे, प्रवाशांकडून सुविधा शुल्क आकारणी करणे, तसेच संबंधित व्यावसायिकांकडून आर्थिक लाभ घेऊन मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा केली आहे तसेच, सन २०२२-२३

या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरू असतानाही त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्त करण्याऐवजी महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित पदाचा गैरवापर करून राज्यातील विविध एस.टी. स्थानकांवरील व्यावसायिक आस्थापनांना मंजुरी देणे, एस.टी. बस ठराविक हॉटेलांवर थांबवून प्रवाशांच्या अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करणे, त्याबदल्यात संबंधित व्यावसायिकांकडून आर्थिक लाभ घेणे तसेच प्रवाशांकडून पिण्याच्या पाण्यासाठी सक्तीने शुल्क आकारण्यात आल्याचे आढळून आले आहे तसेच महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांनी स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावावर मोठ्या प्रमाणात मालमत्ता जमा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.टी. महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागामार्फत या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान चौकशी अधिकाऱ्यांमध्ये बदल करण्यात आला होता व संबंधित अधिकाऱ्यांनी आरोपी महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांना मदत केले असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) व संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती प्रशासकीय, विभागीय अथवा फौजदारी कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा.प. महामंडळाच्या बसस्थानकांवर विविध वाणिज्य आस्थापनांच्या माध्यमातून प्रवाशांना सोईसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विभागीय पातळीवर ई-निविदेद्वारे परवानाधारकांची निवड केली जाते. तसेच प्रवाशांच्या सोईसाठी खाजगी हॉटेल / मोटेलच्या ठिकाणी अधिकृत हॉटेल थांबे देण्याबाबत रा.प.महामंडळाचे धोरण असून त्यानुसार समितीची मंजुरी घेऊन थांबे निश्चित करण्यात आलेले आहेत. या थांब्यांवर प्रवाशांकडून कोणतेही सुविधा शुल्क आकारण्यात येत नाही.

सध्य:स्थितीत, श्री.बामणे उपमहाव्यवस्थापक (निवप) या पदी रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे आर्थिक अधिकार गोठवुन कार्यरत आहेत. तसेच महाव्यवस्थापक (नियोजन व पणन), रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.रा.मा.प. महामंडळ यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

(३) तत्कालीन महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) श्री.बामणे, यांचेबाबतीत सुरक्षा व दक्षता खात्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवर प्रथम तत्कालीन वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मुंबई विभाग यांचेकडे चौकशी सोपविण्यात आली होती. तथापि, श्री.भातमारे, तत्कालीन वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी,रा.प.मुंबई विभाग यांचे विरोधात श्री.बामणे, महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांनी अनुसूचीत जाती जमाती आयोगाकडे दाद मागणार असल्याबाबत सांगून चौकशीवर आक्षेप घेतल्यानंतर सुरक्षा व दक्षता खाते प्रमुख यांनी एक मागासवर्गीय अधिकारी श्री.रविंद्र द. जाधव, सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.ठाणे विभाग यांना सदर चौकशी करणेबाबत आदेश दिले होते.

(४) व (५) महामार्गावरील हॉटेल, मोटेल वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत तत्कालीन महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) श्री.बामणे, यांचेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यांबाबत विषयांकित तक्रारीवर वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मुंबई विभाग यांचेकडून चौकशी अहवाल मागविण्यांत आला असून, त्यांनी सादर केलेल्या अहवाल क्र.१०३, दिनांक २६/११/२०२४ मध्ये श्री.जयेश बामणे, उपमहाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे जबाबदार धरण्यात आलेले आहे व अहवाल कारवाईसाठी सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यांत आलेला आहे.

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सुरु असलेल्या श्री.जयेश बामणे यांच्या मालमत्तेची उघड चौकशीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

## मीरा रोड (जि.ठाणे) येथील अस्मिता क्लब परिसरात सुरक्षारक्षकांवर हल्ला झाल्याबाबत

**(२२) * ८७८६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा रोड येथील अस्मिता क्लब परिसरात बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी कार्यरत दोन सुरक्षा रक्षकांवर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडल्याची बाब दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपीने हल्ल्यापूर्वी संबंधित सुरक्षा रक्षकांकडे त्यांच्या धर्माबाबत विचारणा केली होती व त्यामुळे या घटनेला धार्मिक स्वरूप प्राप्त झाल्याची बाब प्राथमिक तपासात निष्पन्न झाली आहे, या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलीस व दहशतवादविरोधी पथक (ATS) यांच्या संयुक्त पथकाकडून करण्यात येत असून आरोपीच्या निवासस्थानातून काही आक्षेपार्ह साहित्य, संशयास्पद पुस्तके व पहलगाम हल्ल्याच्या तसेच मोबाईलमधून काही संशयास्पद चित्रफिती जप्त करण्यात आल्याची बाब आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील आरोपी व इतर संभाव्य संबंधितांविरुध्द ‘बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा’ (UAPA) तसेच ‘भारतीय न्याय संहिता’ (BNS) अंतर्गत कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे किंवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सदर बाब निदर्शनास आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणातील आरोपीनी सुरक्षा रक्षक आणि त्याचा साथीदार यांना धर्माबाबत विचारणा करुन त्यांनी त्यांचा धर्म सांगितल्यावर त्यांचेवर चाकूने हल्ला करुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याने आरोपी विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११८ (२), १९६ (१) अन्वये नयानगर पोलीस स्टेशन येथे गु. रजि.नं. १६१/२०२६ दिनांक २७/०४/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची संवेदनशीलता तसेच, आरोपीचा उद्देश दहशतवाद पसरविण्याचा असल्याचे तपासामध्ये दिसून आल्याने सदर गुन्ह्याचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आला असून आरोपी विरुध्द बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा १९६७ अंतर्गतदेखील कारवाई करण्यात येत आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील महंमदवाडी भागातील 'रेस्क्यू फाउंडेशन'मधून १२ बांगलादेशी महिलांनी पलायन केल्याबाबत

**(२३) * ८९०७ श्री.योगेश टिळेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महंमदवाडी (जि.पुणे) येथील महिलांना सुरक्षित आश्रय देणाऱ्या 'रेस्क्यू फाउंडेशन' मधील १२ बांगलादेशी महिलांनी पलायन केले असून, सदर घटनेस २० दिवस होवूनही यासंदर्भात पोलीस स्थानकामध्ये गृन्हा नोंदविण्यात आला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात अवैधरित्या बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य वाढत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, मुंबईच्या धर्तीवर पुण्यातही व्यापक स्तरावर 'कोम्बिंग ऑपरेशन' (Combing Operation) राबवून अशा घुसखोरांचा शोध घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने रेस्क्यू फाउंडेशनमधील सुरक्षेच्या त्रुटीं दूर करुन व अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरुध्द मोहीम राबविण्याबाबत तसेच या प्रकारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहरात पोलीसांनी केलेल्या छापा कारवाईमध्ये, मानवी तस्करी करुन, देहविक्री व्यवसायासाठी राज्यात आणलेल्या पिडीत महिलांना ताब्यात घेण्यात आले व त्यांना मा.न्यायालयासमोर हजर केले असता, मा.न्यायालयाच्या आदेशांन्वये, महंमदवाडी येथील "रेस्क्यु फाउंडेशन" मध्ये संरक्षण कामी दाखल करण्यात आले होते. सदर पिडीत महिलांपैकी ११ पिडीत बांगलादेशी महिलांनी दिनांक २२/०३/२०२६ रोजी पलायन केले होते. त्या संदर्भात दिनांक १०/०४/२०२६ रोजी फिर्याद प्राप्त होताच, काळेपडळ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दिनांक १०/०४/२०२६ रोजी गु. र. क्र. १५५/२०२६ बी.एन.एस. कलम १२७ (१), ११५ (१), ३५१(१), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) पुणे आयुक्तालयामध्ये अवैध बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्याकरीता पोलीस ठाणे, परिमंडळ व विशेष शाखा स्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे पुणे शहर आयुक्तालयांतर्गत आजरोजी पर्यंत एकूण १३ "कोम्बिंग ऑपरेशन्स" राबविण्यात आले असून खालीलप्रमाणे बांगलादेशींना हद्दपार करण्यात आले आहेत-

| सन | महिला | पुरुष | मुले/मुली |
|---|---|---|---|
| २०२४ | ३ | - | - |
| २०२५ | ७१ | ५ | १ |
| २०२६ | ४९ | १६ | ३ |

(३) प्रस्तूत प्रकरणी ४ आरोपी महिलांचा शोध घेऊन, ३ आरोपींना अटक करण्यात आली होती, १ फरारी आरोपीचा शोध चालू आहे. पलायन केलेल्या इतर बांगलादेशी महिलांचा शोध चालू आहे. रेस्क्यु फाउंडेशन ही संस्था खाजगी स्वरुपाची असून सदर संस्थेने सिक्युरिटी ऑडिट करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी अशा महिलांना सरकारी निरीक्षण गृहामध्ये ठेवण्याची दक्षता घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) * ८९४२ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात पशुधनाच्या आरोग्याची जबाबदारी असलेल्या पशुवैद्यकीय विभागामध्ये ५५ टक्क्यांहून अधिक पदे रिक्त असून, पशुधनाच्या तुलनेत कार्यरत असलेल्या १५२ दवाखान्यांमध्ये केवळ ६६ पशुवैद्यक उपलब्ध आहेत, तर ७६ पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील एकूण पशुधन संख्या विचारात घेता, पशुधनावर वेळेवर उपचार व लसीकरण करण्यासाठी किमान ४० हून अधिक नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांची आवश्यकता असून, रिक्त पदांमुळे पशुपालकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पशुवैद्यकीय सेवा बळकट करण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कालबध्द योजना आखण्यात आली आहे तसेच सांगली जिल्ह्यात आवश्यकतेनुसार नवीन श्रेणी-१ व श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे आणि जिल्ह्यातील फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची (Mobile Veterinary Units) संख्या वाढवून दुर्गम भागातील पशुपालकांना वेळेवर औषधोपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचा सुधारीत आकृतिबंध दिनांक १०/१०/२०२४ रोजी निश्चित करण्यात आला असून, त्यानुसार सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ११/०६/२०२६ रोजी परीक्षा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लवकरच उमेदवारांची शिफारस अभिप्रेत आहे.

पशुवैद्यकीय सेवावर परिणाम होऊ नये म्हणून जिल्ह्यामध्ये (मिरज,कवठेमहांकाळ, जत, पलुस व आटपाडी या तालुक्यांमध्ये) मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतंर्गत पशुपालकांच्या दारात पशुवैद्यकीय सेवा आवश्यकतेनुसार पुरविल्या जातात. तसेच दुर्गम भागामध्ये टोल फ्री क्र.१९६२ द्वारे पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सन २०१९ मधील चालक तथा वाहक भरती प्रक्रियेतील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(२५) * ९९६४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ मध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाची राज्यातील दुष्काळग्रस्त २१ विभागांमध्ये चालक तथा वाहक या पदासाठी सात हजारांपेक्षा अधिक पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून मंजूर पदसंख्या उपलब्ध असतानाही अनेक पात्र उमेदवारांना अद्याप नियुक्ती देण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रियेमध्ये सर्व परीक्षा व कागदपत्र पडताळणी पूर्ण करून पात्र ठरलेल्या पुरवणी (Waiting List) व अतिरिक्त यादीवरील उमेदवारांना गत सहा वर्षांपासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत राहावे लागत असून, सन २०१६-१७ च्या भरती प्रक्रियेप्रमाणे नियुक्ती देण्याबाबतची मागणी उमेदवारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक विभागांमध्ये चालक व वाहकांची प्रचंड कमतरता असल्याने एसटीच्या अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागत असून विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त सेवा व ओव्हरटाईमचा (Overtime) भार पडत असताना पात्र उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याबाबत प्रशासनाकडून दिरंगाई केली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्यानुषंगाने पुरवणी व अतिरिक्त यादीतील पात्र उमेदवारांना तातडीने नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) सन २०१९ च्या भरती प्रक्रीयेतील निवड यादी व अतिरिक्त निवड यादी प्रमाणे विभागीय स्तरावर भरती प्रक्रीया पार पाडून पात्र उमेदवारांना आरक्षण व गुणवत्तेनुसार नेमणूका देण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) रा.प.महामंडळामध्ये बसेसच्या नियमीत फेऱ्या चालविण्यात येतात.

सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदातील निवड यादी व अतिरिक्त यादीवर नसलेल्या शिल्लक २८६१ उमेदवांना रा.प. महामंडळात सामावून घेण्याबाबतची बाब अमान्य करण्यात आलेली आहे.

-----------------

## महावितरण कंपनीची वीज ग्राहकांकडे असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२६) * ८७७२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) च्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ अखेरच्या वीज थकबाकीमध्ये कृषी वापरासाठी सुमारे ७९ हजार ५२७ कोटी रुपये, घरगुती वापरासाठी २ हजार ८४६ कोटी रुपये, व्यावसायिक वापरासाठी ५२९ कोटी रुपये तसेच औद्योगिक वापरासाठी १ हजार ६०३ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याने ३२ हजार ७६१ कोटी रुपयाच्या कर्जावरील व्याजाचा मोठा आर्थिक भार कंपनीवर पडत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जावरील वाढत्या व्याजभारामुळे महावितरण कंपनी आर्थिक अडचणीत सापडली असून कंपनीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने सरकारी हमीवर बाँडस जारी करून सुमारे ३२ हजार ७६१ कोटी रुपये उभारण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्याचे तसेच कृषी पंप ग्राहकांसाठी स्वतंत्र "एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड (MSAPL)" कंपनी स्थापन करून महावितरण कंपनीची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज ग्राहकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी प्रलंबित असून त्याची वसुली करण्याऐवजी महावितरण कंपनीला भांडवली बाजारात सूचीबध्द करण्याच्या निर्णयामुळे खासगी भांडवलदारांना कंपनीवरील नियंत्रण मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचा आरोप राज्यातील वीज कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वीज ग्राहकांकडे प्रलंबित असलेली थकबाकी टप्प्याटप्प्याने वसूल करण्यासाठी कोणता आराखडा तयार केला तसेच थकबाकी असणाऱ्या ग्राहकांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महावितरण कंपनीची माहे ३१ डिसेंबर, २०२५ अखेर कृषी ग्राहकांची थकबाकी सुमारे ८१, ३६८ कोटी रुपये, घरगुती ग्राहकांची २,६४८ कोटी रुपये, व्यावसायिक ग्राहकांची ४७२ कोटी रुपये, औद्योगिक ग्राहकांची १,८२५ कोटी रुपये, सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहकांची ३,३२० कोटी रुपये तसेच पथदिव्यांची ४,२३४ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित होती. तसेच माहे एप्रिल २०२६ अखेर खेळत्या भांडवला करीता घेतलेल्या कर्जाची देयता ६८ हजार ३०७ कोटी आहे. वरीलप्रमाणे वीज

ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर वीज बिल थकबाकी असल्याने कंपनीला दैनंदिन कामकाज सुरळीत पणे चालविण्याकरीता जसे वीज खरेदी देयकांची अदायगी वेळेत करणे, वीज पुरवठा अखंडित ठेवणे करीता खेळते भांडवल उभारावे लागते, त्यामुळे कर्जावरील व्याजाचा आर्थिक भार कंपनीवर आहे.

(२) होय.

राज्यातील जनतेला विजेची हमी आणि विद्युत क्षेत्रात गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यामध्ये महावितरण कंपनीची महत्त्वाची भूमिका लक्षात घेता, महावितरण कंपनीची आर्थिक क्षमता मजबूत करणे, कंपनीची आर्थिक स्थिती स्थिर करणे तसेच वितरण क्षेत्रात दीर्घकालीन शाश्वता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याने शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०२६ नुसार महावितरण कंपनीची आर्थिक पुनर्रचना, त्याकरीता शासन हमी असलेल्या कर्जदायीत्वाची (रुपये ३२,६७९ कोटी माहे मार्च २०२५ अखेर) शासनाकडून स्वीकृती करून त्याचे सरकारी रोखे जारी करणे, कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन व महावितरण अकृषिक कंपनीचे सूचीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) थकबाकी वसुलीसाठी महावितरणकडून विविध उपाय योजना करण्यात येत आहेत. उदा. ग्राहकांना प्रत्यक्ष भेटून सूचना देणे, संगणकीय प्रणाली मधून भ्रमणध्वनीद्वारे संदेश देणे, ग्राहक सेवा केंद्रातून थकबाकी भरणे करीता दुरध्वनीद्वारे आवाहन करणे इ. थकबाकी भरणे करीता विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ नुसार थकबाकी भरण्यास नोटीस देण्यात येते. तथापि, त्यानंतरही ग्राहकाने (७.५ एच. पी. पर्यंत कृषीपंप ग्राहक वगळून) थकबाकी न भरल्यास ग्राहकाचा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात येतो. स्मार्ट मीटर बसवलेल्या थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा स्वयंचलित यंत्रणेद्वारे बंद केला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर वैरण विकास कार्यक्रम राबविण्याबाबत

**(२७) * ९६६० श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्रीमती भावना गवळी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशांत महासागरातील ‘एल निनो’ या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून, यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने’अंतर्गत २०० कोटी रुपयांचा वैरण विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई टाळण्यासाठी शासनाने जिल्हानिहाय ८ ते १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असून, सदर निधी कोणत्या जिल्ह्यांना, किती प्रमाणात वितरित करण्यात आला व सदर वैरण विकास कार्यक्रमांतर्गत चारा पिकांच्या बियाण्यांचे वितरण करणे, त्यासाठी महाबीजमार्फत बियाणे उपलब्ध करून घेणे आणि आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणता कृती आराखडा निश्चित केला आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सदर कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच पशुधनासाठी पिण्याचे पाणी, पशुवैद्यकीय सेवा आणि इतर आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत व चारा टंचाईमुळे शेती आणि दुग्ध व्यवसायावर होणाऱ्या विपरीत परिणामांपासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) एल निनो" (E१ Nino) च्या प्रभावामुळे राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा होण्याची शक्यता व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वैरण विकास कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान ८ ते १० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची तसेच आवश्यकता भासल्यास अधिक निधीची तरतूद करण्याबाबत दिनांक २१ एप्रिल २०२६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविले आहे. त्यानुसार आवश्यक तो निधी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल. चारा पिकासाठी चारा बियाणांची मागणी महाबीज, राष्ट्रीय बियाणे मंडळ व इतर बियाणे पुरवठा संस्था यांचेकडून करण्यात आली असून जिल्हानिहाय मागणीनुसार पशुपालकांना चारा बियाणे वितरीत करण्यात येईल.
(३) पशुधनास नियमितरित्या पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत तसेच टंचाई सदृश: परिस्थितीत पशुधनाचे व्यवस्थापन करण्यासंदर्भात पशुपालकांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशीर बाईक टॅक्सी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२८) * ९७०७ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारंपारिक इंधनावरील (Petrol/Diesel) बाईक टॅक्सीचे परवाने नाकारून सदर सेवेवर राज्य शासनाने माहे मार्च, २०२६ मध्ये बंदी घातली असतानाही मुंबई शहर व उपनगरे (अंधेरी, बोरीवली, घाटकोपर, कुर्ला इ.) व नागपूर सारख्या मोठ्या शहरांमध्ये ओला, उबेर व रॅपिडो सारख्या कंपन्यांच्या माध्यमातून बेकायदेशीर बाईक टॅक्सी वाहतूक सुरू असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेकायदेशीर बाईक टॅक्सी चालकांची कोणतीही अधिकृत चारित्र्य पडताळणी (Police Verification) झालेली नसल्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित कंपन्यांच्या व्यवस्थापनावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आलेले असूनही, या कंपन्यांच्या मोबाईल ॲपवरून बेकायदेशीर बुकिंग सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर वाहतुकीला कायमचा प्रतिबंध घालण्यासाठी व महिला प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र ई-बाईक टॅक्सी नियम, २०२४' ची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी व सदर कंपन्यांवर कारवाई करुन ॲपवर निर्बंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ नुसार बाईक टॅक्सी चालविणाऱ्या चालकाकडे महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ नुसार अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी जारी केलेला सार्वजनिक सेवा वाहन बिल्ला (बॅज) असणे अनिवार्य करण्यात आले आहे. सदर बिल्ला (बॅज) जारी करतेवेळी अर्जदाराची चारित्र्य पडताळणी करण्याची तरतूद आहे.

ॲप-आधारित कंपन्यांमार्फत परवान्याविना दुचाकी वाहनांचा प्रवासी वाहतुकीसाठी वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर अशा प्रकारच्या बेकायदेशीर प्रवासी वाहतुकीविरुध्द नियमित तपासणी मोहिम राबविण्यात येत असून मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्या अंतर्गत नियमांनुसार कारवाई करण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत माहे एप्रिल, २०२५ ते माहे मे, २०२६ या कालावधीत एकूण १०२५ दोषी दुचाकी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यापैकी २१७ दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी विविध पोलीस स्थानकांमध्ये १४ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तसेच दोषी वाहन चालकांकडून रुपये १८.५६ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला आहे.
महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा अनधिकृत सेवांबाबत प्राप्त तक्रारींची दखल घेऊन संबंधित वाहन चालक व सेवा पुरवठादारांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात आली असून सेवांचे संचालन करणाऱ्या कंपन्यांना लागू असलेल्या कायदेशीर तरतूदींचे पालन करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ नुसार विहित केलेल्या चालक पडताळणी, जीपीएस आधारित ट्रॅकिंग, आपत्कालीन तक्रार निवारण यंत्रणा, प्रवासाची नोंद व इतर सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित सेवा प्रदात्यांना निर्देश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन अधिनियम व महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंमली पदार्थांची निर्मिती व तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२९) * ८६६९ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.योगेश टिळेकर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.संजय खोडके, श्री.विक्रांत पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंमली पदार्थ तस्करीबाबत दरवर्षी राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार साधारण: १५००० गुन्हयांची नोंद होत असून यापैकी मुंबईनंतर सर्वाधिक ४३४ गुन्हयांची नोंद नागपूर शहरात झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात झोम्बी ड्रग्जचा प्रसार वाढत असून विशेषत: कोल्हापूरच्या सीमावर्ती भागातून होणारी गांजा, चरस, कोकेन इत्यादीची तस्करी तसेच सांगली-कराड मध्ये निर्जन ठिकाणी उभारलेले ड्रग्ज निर्मिती कारखाने व तेथून तरुणांच्या पाटर्यांमध्ये सहज उपलब्ध होणारा ड्रग्जसाठा यामुळे पश्चिम महाराष्ट्र ड्रग्ज-हब बनला असून माहे जानेवारी, २०२५ ते मार्च,२०२६ या १५ महिन्यांच्या कालावधीत कोल्हापूर परिक्षेत्रातून ६८ कोटी रूपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरात आंतरराष्ट्रीय स्तरावरून तसेच आंतरराज्य व स्थानिक स्तरावरून गांजाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असून छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्र प्रदेश या ‘गोल्डन ट्रँगल’ च्या माध्यमातून विविध मार्गाव्दारे पुण्यात गांजा आणला जात असून शहरात त्याचे वितरण ड्रोन, कुरिअर सेवा, खासगी वाहने, तसेच रेल्वे आणि बसव्दारे केले जात असल्याचे तसेच पुणे शहरातील हायड्रोपोनिक गांजाची विशेष मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंधेरी (मुंबई) येथील अंमली पदार्थ व ड्रग्ज निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर माहे एप्रिल, २०२६ मध्ये केलेल्या कारवाईत ३० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ व ड्रग्ज तसेच टिटवाळा येथील कारवाईत ६ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ व ड्रग्जसह एकूण १० लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल, शिरपूर (जि.धुळे) शहरातून ४ लाख १६ हजार रूपये किंमतीचे मेफेड्रॉन तसेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील खारघर, कळंबोली, पनवेल कामोठे, तळोजा व उरण भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थांचा साठा जप्त केल्याच्या घटना वारंवार निदर्शनास आल्या असून सदर अंमली पदार्थ व ड्रग्जमध्ये गंभीर गुन्हे करणाऱ्या संबंधित गुन्हेगारांवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यात आंतरराष्ट्रीय, आंतरराज्यीय व स्थानिक स्तरावरून होणारी अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी समन्वय यंत्रणा कार्यान्वित करून तसेच राज्यामध्ये अंमली पदार्थाची होणारी साठवण, वाहतूक व विक्री रोखण्यासाठी पोलीस व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्समार्फत विशेष कारवाई, गुप्त तपास, हॉटस्पॉट ओळख, परदेशी नागरिकांचा सहभाग, भाडेकरू पडताळणी, ओळख नोंदणी व देखरेख यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच संबंधित गुन्हेगारांवर दंडात्मक कारवाई करून प्रतिबंध घालण्याबाबत तसेच राज्यातील तरूण पिढीला नशामुक्त करून त्यांना सदर गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी जागरूकता मोहिम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्याविरुध्द १३९५४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुंबई शहरामध्ये सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगल्या संदर्भात एकूण ११४१ गुन्हे दाखल असून त्यामध्ये १४५४ आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्याविरुध्द ६४८२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच नागपूर शहरात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगल्या संदर्भात एकूण १८८ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३१२ आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्याविरुध्द ४१३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) कोल्हापूर परिक्षेत्रातील घटक जिल्ह्यामध्ये झोंबी या अंमली पदार्थाचा वापर अथवा त्याची तस्करी झालेबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही.

माहे जानेवारी, २०२५ ते मार्च २०२६ या १५ महिन्यांच्या कालावधीत कोल्हापूर परिक्षेत्रामध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाई संदर्भात एकूण ९२६ गुन्हे नोंद करण्यात आले असून ६७७ आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यामध्ये अंदाजे रु ६७.०१ कोटी किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

(३) पुणे शहरात आंतराष्ट्रीय स्तरावरून तसेच आंतरराज्य व स्थानिक स्तरावरून गांजाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असून छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्र प्रदेश या राज्यातून विविध मार्गाव्दारे पुण्यात गांजा आणला जात असून त्याचे वितरण ड्रोन, कुरिअर सेवा, खासगी वाहने, तसेच रेल्वे आणि बसद्वारे केले जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

पुणे शहरात हायड्रोपोनिक गांजाच्या अनुषंगाने सन २०२५ व सन २०२६ मध्ये एकूण ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

(४) "अंधेरी (मुंबई) येथील अंमली पदार्थ व ड्रग्ज निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर माहे एप्रिल २०२६ मध्ये केलेल्या कारवाईत ३० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ व ड्रग्ज" या अनुषंगाने पश्चिम प्रादेशिक विभाग-परिमंडळ ०३ अंतर्गत पोलीस ठाणेकडून कोणतीही कारवाई अथवा बाहेरच्या शाखेकडून करण्यात आलेली नाही.

अंमली पदार्थ विरोधी पथक, सीआयडी, मुंबई यांनी घाटकोपर पोलीस ठाणे येथे एनडीपीएस कलम ८,२२,२९ अन्वये दाखल गुन्हा गु.र.क्र. ४५/२०२६ (साकीनाका पो.स्टे. ३८६/२०२६) मधील संशयीत आणि पाहिजे असलेली महिला आरोपीस बिल्डींग नं.२ पद्मावती रॉयल, टिटवाळा पुर्व येथून ताब्यात घेवून तिच्या घराची झडती घेतली असता २ किलो ३० ग्रॅम वजनाचा अंदाजे रुपये ५,०७,५०,०००/ किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आले असून सद्य:स्थीतीत न्यायालयीन कोठडीत आहेत व गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

शिरपूर (धुळे) शहरागत असलेल्या शहादा फाट्याजवळील हॉटेल जय भद्रा टी पॉईंट येथे एका व्यक्तीच्या ताब्यात २०.८४ ग्रॅम वजनाचे रुपये ४,१६,८००/- किंमतीचा एमडी (मेफेड्रॉन) सदृष्य अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्याविरुध्द शिरपूर शहर पोलीस ठाणे, जि.धुळे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०४/०६/२०२६ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

नवी मुंबई आयुक्तालयातील पनवेल तालुक्यातील खारघर, कळंबोली, पनवेल, कामोठे, तळोजा व उरण या ठिकाणी अंमली पदार्थ संदर्भात एकूण २५ गुन्हे दाखल असून ३६ आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यामध्ये अंदाजे रुपये १.७९ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(५) राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) व पोलीस घटकांमार्फत एकूण रुपये ५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन जानेवारी २०२६ ते एप्रिल २०२६ पर्यंत अंमली पदार्थ जवळ बाळगल्या संदर्भात एकूण ११४२ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये १६२६ आरोपींना अटक करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्यांत एकूण अंदाजे रुपये २५४.५३ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच अंमली पदार्थ सेवन करणाऱ्याविरुध्द ३१९९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे संपूर्ण देशातून समूळ उच्चाटण करण्याच्या धोरणाच्या अनुषंगाने राज्याने "A Whole-of-Government Approach" विकसीत केलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाची ही मोहिम राज्यातील विविध विभागामध्ये समन्वय साधून गृह विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. त्याकरीता अवैध अंमली पदार्थांची शेती/लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री व सेवनावर प्रतिबंध घालण्याबाबत व अंमली पदार्थाचा प्रसारावर आळा घालण्याकरीता व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राज्यामध्ये विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पोलीस भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या मैदानी चाचणीदरम्यान दोन उमेदवारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३०) * ८६७९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) येथील महाराष्ट्र पोलीस भरती २०२६ च्या मैदानी चाचणी (Physical Test) दरम्यान दीपक भास्कर वाव्हळ या २६ वर्षीय तरुणाचा तसेच माहे मार्च, २०२६ मध्ये शिवाजीनगर (जि.पुणे) येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पुरुषोत्तम बारकुल या २३ वर्षीय तरुणाचा १६०० मीटर धावत असताना मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र पोलीस भरती २०२६ च्या मैदानी चाचणी दरम्यान १६०० मीटर धावण्याच्या चाचणीत थकवा, अतिउष्णता किंवा हृदयविकाराच्या झटक्याने (Cardiac Arrest) उमेदवार कोसळत असल्याचे दिसून आल्यामुळे पोलीस प्रशासनाच्या मैदानी चाचणीच्या वेळी सुरक्षितता आणि वैद्यकीय सुविधांबाबतचे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून पोलीस दलातील भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या मैदानी चाचणी दरम्यान भविष्यात कोणत्याही उमेदवाराला नाहक जीव गमवावा लागू नये, याकरीता उमेदवारांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना तात्काळ वैद्यकीय व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पोलीस शिपाई भरतीमध्ये शारीरिक चाचणीचे आयोजन करताना करावयाच्या उपायोजनांबाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांनी सर्व घटक कार्यालयांना खालीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत :- i) स्थानिक तापमान विचारात घेऊन उमेदवारांची शारीरिक चाचणी सकाळी ०९.०० वाजेपर्यंत व सायंकाळी ०५.०० वाजल्यानंतर घेण्यात यावी. उन्हाचा प्रवाभ वाढल्यानंतर १६०० मीटर धावणे ही शारीरिक चाचणी घेण्यात येऊ नये.

ii) शारीरिक चाचणीतील १,६०० मीटर, ८०० मीटर व १०० मीटर धावणे चाचणी सुरु होण्यापुर्वी व चाचणी झाल्यानंतर उमेदवारास बिस्किटे व ग्लुकोजचे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे जेणे करुन उमेदवारास Dehydration चा त्रास होणार नाही.

iii) उमेदवारास शारीरिक त्रास आहे किंवा कसे तसेच उमेदवार धावण्यास सक्षम आहे किंवा कसे याबाबत उमेदवारास विचारुन होकार दिल्यानंतरच शारीरिक चाचण्या घेण्यात याव्यात. नकार दिल्यास सदर उमेदवाराची चाचणी त्याच दिवशी अन्य वेळेत घेण्यात यावी.

iv) उमेदवार आजारी असल्यास वैद्यकीय अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन अन्य दिवशी शारीरिक चाचणीकरीता बोलाविण्यात यावे.

शारीरिक चाचणी दरम्यान कोणालाही इजा होणार नाही, याची पूर्णत: काळजी घेण्यात आली असून शारीरिक चाचणी दरम्यान आवश्यक तेथे वैद्यकीय अधिकारी आवश्यक त्या सुविधेसह तसेच रुग्णवाहीकेसह तैनात करण्यात आले होते. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत व कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही याची खबरदारी घेण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील कोटयवधी रूपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३१)** * **९३९० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ औष्णिक वीज निर्मिती केंद्रात 'व्हेरिएबल कॉस्ट' अंतर्गत इंधनाव्यतिरिक्त अन्य कामांवर नियमबाह्य खर्च करून सुमारे १५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी मा.व्यवस्थापकीय संचालक, महाजेनको (MSPGCL) यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कथित गैरव्यवहारामुळे महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, यामध्ये काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अपहारित रक्कम वसूल करण्याबाबत आणि दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, सदर निवेदनामध्ये, आर्थिक नुकसान झाले असल्याचे तसेच यामध्ये काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(३) व (४) तद्नुषंगाने सदर प्रकरणी सखोल तपास करण्यासाठी महानिर्मिती कंपनीद्वारे पाच सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

चौकशी समितीचे कामकाज सुरू असून, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील सावित्री नदीपात्राचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३२) * ९५९१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर नगरपंचायतीकडून (ता.पोलादपूर, जि.रायगड) गत काही वर्षापासून मोठ्या प्रमाणात कचरा थेट सावित्री नदीपात्रात टाकला जात असल्यामुळे नदी प्रदूषित होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक व इतर कचरा सावित्री नदीपात्रात मिसळत असल्याने पिण्याचे पाणीही प्रदूषित होवून पाळीव भटक्या प्राण्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलादपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा मुद्दा गंभीर झाला असून अनेक वर्षापासून डम्पिंग ग्राउंड नसल्याने चोळीई- सावित्री संगम परिसरात कचऱ्याचा ढीग साचत असल्याने यासंदर्भात विविध संघटनांनी आंदोलन केले आहे तसेच इमारती उभारताना नदीचा भाग सुरक्षित ठेवून शहरीकरण करण्यासाठी शासनाने कृती आराखडा तयार करण्याची मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलादपूर तालुक्यातून वाहणाऱ्या सावित्री नदीच्या पात्रातील जुना पूल कोसळला त्यामुळे एमआयडीसी मधील केमिकल्स नदीत मिसळत असल्याने आजूबाजूचा परिसर प्रदूषित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पोलादपूर शहराचे शहरीकरण होत असतानाच ड्रेनेजची लाईन व घनकचरा व्यवस्थापन आणि ड्रेनेजवर प्रक्रिया करण्याची यंत्रणा उभारून नदी परिसरच्या सुरक्षा रेषेत नदी परिसर सुरक्षित व सुशोभित केल्याशिवाय बांधकाम प्रकल्पांना नगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी सावित्री नदीचे होणारे प्रदूषण तात्काळ रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्याधिकारी, नगरपंचायत पोलादपूर यांच्या अहवालानुसार पोलादपूर नगरपंचायत हद्दीत निर्माण होणारा कचरा गेल्या काही वर्षात पोलादपूर नगरपंचायतीच्या गट क्रमांक ६/३ व ७/२ या क्षेपणभुमीवर टाकण्यात येत आहे. सदर जागा नदीपासून जवळ आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सावित्री नदीवरील शेडाव डोह, दादली ब्रीज, नांगलवाडी जॅकवेल इ. ठिकाणी दरमाह पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी नमुने संकलित केले जातात. सदर अहवालानुसार पाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेत असल्याचे आढळून आले आहे.

(२) सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, पोलादपूर यांच्या अहवालानुसार सावित्री नदीपात्रातील पिण्याचे पाणी प्रदूषित होऊन पाळीव तसेच भटक्या प्राण्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे आढळून आलेले नाही. तसेच सदर बाबतील कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) पोलादपूर नगरपंचायत हद्दीत घनकचरा पर्यायी जागा व्यवस्थापनास वापरण्यासंदर्भात "आपली माती आपली माणसे" या संघटनेमार्फत दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी जन आंदोलन करण्यात आले आहे.

(४) महाड औद्योगिक वसाहत क्षेत्रातील कारखान्यांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी स्वत:ची स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा बसविलेली आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुमिगत पाईपलाईनव्दारे पुढील प्रक्रियेसाठी सामायिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेकडे पाठविले जाते. सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची प्रक्रिया केली जाते व सदर प्रक्रियाकृत सांडपाणी अंदाजे २३ कि.मी. अंतरावर बंदिस्त पाईपलाईनव्दारे सावित्री खाडीमध्ये ओवळे गावाजवळ सोडण्यात येते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी उद्योगांना भेटी देऊन पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान दोषी आढळणाऱ्या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत आवश्यक कारवाई करण्यात येत असते.

(५) व (६) नगरपंचायत, पोलादपूर मार्फत सांडपाणी प्रक्रिया करीता स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. पोलादपूर नगरपंचायतीमार्फत घनकचरा व्यवस्थापनाकरीता तात्पुरत्या स्वरुपात जागेची निश्चिती केली असून सदर जागा खरेदी करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचा आर्थिक तोटा कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३३) * ९४०५ श्री.सचिन अहिर, श्री.किशोर दराडे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात प्रवासी सेवा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस सेवा आर्थिकदृष्ट्या तोट्यात असून महामंडळाचा संचित तोटा १२ हजार कोटी एवढा असून त्यामध्ये डिझेल, भांडार खरेदी व पुरवठा, रजा रोखीकरण रक्कम, विमा रक्कम, वैद्यकीय व प्रवासभत्ता आणि ५० लाख रुपयांची अपघात सहाय्यता रक्कम यासह महागाई भत्ता, वाढीव घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ इ.रकमेचा समावेश असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरासरी दररोज १ कोटी ६० लाख रुपयांचा तोटा एसटी महामंडळाला सहन करावा लागत असून सदर तोटा होणाऱ्या विभागापैकी नागपूर, नाशिक, कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, ठाणे अशा २३ विभागामध्ये दिवसेंदिवस तोटा वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस.टी.महामंडळाला राज्य शासनाकडून दर महिन्याला केवळ सवलत मुल्य प्रतिपूर्तीची रक्कम दिली जात असे असताना मात्र महावितरण (मराविम) कंपनीला एकीकडे ३२ हजार ६७९ कोटी इतकी मोठी रक्कम देण्यात आली आहे, त्याप्रमाणे एसटी, महामंडळाला देखील आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी एसटी महामंडळ कर्मचारी संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बस ताफ्याचे आधुनिकीकरण, इंधन बचत, प्रवासी संख्या वाढविणे, रिक्त पदे भरणे, मार्ग पुनर्रचना, डिजिटल तिकीट व्यवस्था, महसूल वाढविणे तसेच शासन अनुदान देणे, ग्रामीण भागातील नागरिकांना अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा अखंडितपणे उपलब्ध करून देण्याबाबत तसेच एस.टी. महामंडळाचा आर्थिक तोटा कमी करून सेवा नफ्यात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ अखेर संचित तोटा या रक्कम रुपये ११६०.४८ कोटी एवढा कोटी एवढा आहे.
(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात माहे-मार्च, २०२६ अखेर रा.प. महामंडळातील ३१ विभागांपैकी ०८ विभाग नफ्यात असून २३ विभागांना तोटा झाला आहे.
(३) शासनाकडून रा.प. महामंडळास सवलत मुल्याची प्रतिपुर्ती करण्याकरीत दरमहा निधी उपलब्ध करुन आर्थिक मदत करण्यात येते.

उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दिनांक २१/०४/२०२६ रोजी शासन निणर्यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) ने विविध पायाभुत योजना व कार्यकारी आवश्यतासाठी घेतलेल्या काही कर्जावर महाराष्ट्र शासनाची हमी असलेल्या रुपये ३२,६७९ कोटी कर्जदायित्वाची शासनाकडून स्वीकृत करुन ही कर्ज फेडण्यासाठी १५ वर्षाच्या मुदतीचे सरकारी रोखे जारी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) व (५) सन २०२६-२०२७ साठी बसखरेदी, बसस्थानकाचे आधुनिकीकरण इत्यादीसाठी रुपये २५००.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील जागांचे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर विकसन करुन बसस्थानक, आगार इ. च्या विकसना सोबतच महामंडळाच्या कायमस्वरुपी अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत विकसित करण्याचे नियोजित आहे. इंधन बचतीचे महत्व समजावून चालकांना त्याबाबचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

बस ताफ्याच्या आधुनिकीकरणाकरीता रा.प महामंडळाच्या वाहन ताफ्यात पर्यावरण पुरक बीएस-६ बनावटीची २६४० वाहने समाविष्ट करण्यात आलेली असून, नविन ३००० वाहने रा.प महामंडळाच्या वाहन ताफ्यात समाविष्ट करण्यात येणार आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ११० वाहने समाविष्ट झालेली आहेत.

रा.प.महामंडळामध्ये बाह्य संस्थेद्वारे कंत्राटी पध्दतीने चालक-वाहक व सहाय्यक घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच उत्पन्न वाढविण्यासाठी दैनंदिन उत्पन्न वाढ पंचसुत्री योजना, तीर्थाटन योजना, इतर योजना राबविण्यात येत आहे. तोट्यातील विभागांना तोटा कमी करण्यासाठी बैठक घेऊन मार्गदर्शन करण्यात येत आहे.

तसेच जाहीराती, बसेसला हॉटेलला अधिकृत थांबा, बांधीव व मोकळया जागांवर वाणिज्य आस्थापना सुरु करुन उत्पन्न वाढविण्याचे काम सुरु आहे.

-----------------

## अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या नियमबाह्य नियुक्तीबाबत

**(३४) * ९२३५ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील 'पोलीस निरीक्षक (गुन्हे)' या महत्त्वाच्या पदावर एका भ्रष्ट पोलीस निरिक्षकाची नियुक्ती करताना पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १४ जानेवारी, २००९ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे व निकषांचे उल्लंघन केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'पोलीस निरीक्षक (गुन्हे)' या पदासाठी संबंधित अधिकारी हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक असावा आणि त्याच्याविरुध्द कोणतीही फौजदारी खटला सुरू असता कामा नये, असे निकष असतानाही सदर पोलीस निरिक्षकावर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत यवतमाळ विशेष न्यायालयात खटला (केस नं. ९७/२०२०) सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलमांसह भारतीय दंड संहितेच्या कलम २०१, ३८४, ३८५ व ३८९ नुसार खंडणी, पुरावे नष्ट करणे आणि धमकी देण्यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून त्यांना यापूर्वी अटक होऊन ३ दिवसांची पोलीस कोठडी झाली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बनावट गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन ५० लाख रुपयांचे कोरे चेक व जमिनीचे खरेदीखत जबरदस्तीने घेतल्याचा गंभीर आरोप असलेल्या आणि ज्यांच्या खटल्याची सुनावणी दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी होती अशा अधिकाऱ्याला गुन्हे शाखेसारख्या महत्वाच्या पदावर नियुक्त करण्याची कारणे काय आहेत तसेच पोलीस दलाची प्रतिमा जपण्यासाठी आणि नियुक्तीच्या नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याची सदर पदावरून तात्काळ बदली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

श्री.संदिप चव्हाण, पोलीस निरीक्षक यांच्या विरूध्द, पोलीस ठाणे, यवतमाळ शहर, येथे गुन्हा क्र.१३/२०१९ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम व भारतीय दंड संहिता अन्वये, गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हयात, विशेष खटला क्र.९७/२०२० अन्वये, प्रथम जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथे सुरु आहे. सदर खटला न्यायप्रविष्ट असून, त्याची पुढील सुनावणी दिनांक ३०/०६/२०२६ रोजी आहे. तसेच, श्री.संदिप चव्हाण, पोलीस निरीक्षक यांचे विरुध्द, भारतीय दंड संहितेच्या कलम २०१, ३८४, ३८५ व ३८९ नुसार, गुन्हा दाखल असून, त्यांना ६ दिवस पोलीस कोठडी मिळाली होती.

(४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या दिनांक २७/०५/२०२५ च्या आदेशान्वये, श्री.चव्हाण यांची अमरावती ग्रामीण या घटक आस्थापनेवरून, अमरावती शहर या घटक आस्थापनेवर बदली करण्यात आली. पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांच्या दिनांक ०३/०६/२०२५ च्या आदेशान्वये, त्यांना प्रथम पोलीस कल्याण शाखा, अमरावती शहर येथे पदस्थापना देण्यात आली. तद्नंतर, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या दिनांक १६/०६/२०२५ च्या आदेशान्वये, श्री.चव्हाण यांना गुन्हे शाखा, युनिट-२ येथे पदस्थापना देण्यात आली होती.

श्री.चव्हाण यांचे विरूध्द सुरू असलेल्या न्यायालयीन खटल्यामध्ये, त्यांच्या विरूध्द गुन्हे दाखल असल्याने, पोलीस आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक ०५/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये, त्यांची गुन्हे शाखा, अमरावती येथून पो. स्टे. राजापेठ प्रभारी येथे बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांचे दुरध्वनीवरील संवाद सार्वजनिक माध्यमांमध्ये प्रसारित केल्याबाबत

**(३५) * ८९१४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील मध्यवर्ती कारागृहातील वर्ग-२ मधील कैद्यांनी कारागृहातून केलेल्या दुरवध्वनीवरील संवादांचे रेकॉर्डिंग करून ते सार्वजनिक माध्यमांमध्ये प्रसारित करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संवाद प्रसारित झाल्यामुळे कारागृहातील अंतर्गत सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून यामुळे कारागृह प्रशासनाच्या गोपनीयतेबाबत साशंकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कैद्यांचे अधिकृत संवाद रेकॉर्ड करून ते सार्वजनिक करणाऱ्या दोषी कर्मचारी किंवा संबंधित व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

बीड जिल्हा कारागृहातील बंदी अजहर पठाण याने स्वतःच्या स्मार्टकार्डसह, बंदी अमीर शेख याच्याही दूरध्वनी सुविधेचा गैरवापर केला. बंदी पठाण याने दिनांक २१/०४/२०२६ रोजी स्वत:च्या भावास ॲलन फोनवरुन संपर्क करुन, भावाने त्यांच्या नातेवाईकास (मामा) कॉन्फरन्स कॉल जोडून दिला. नातेवाईकाने (मामा), सदरच्या कॉलचे रेकॉर्डिंग करून, ती ऑडिओ क्लिप सोशल मीडिया आणि प्रसार माध्यमांवर प्रसारित केली आहे.

(२) बंद्यांच्या नातेवाईकांचे मोबाईल क्रमांक संबंधित पोलीस स्टेशनमार्फत पडताळणी करून मंजूर करण्यात येतात. तथापि, संभाषण दरम्यान नातेवाईकांकडून इतर व्यक्तींना कॉन्फरन्स कॉलवर जोडणे अथवा कॉल रेकॉर्ड करणे हे ओळखण्याची सुविधा ॲलन फोन प्रणालीमध्ये उपलब्ध नाही.

(३) उपरोक्त घटनेसंदर्भात दक्षता पथकाने दिनांक २४/०४/२०२६ रोजी बीड जिल्हा कारागृहास भेट देऊन, सदर प्रकरणाची चौकशी केली. चौकशी अहवालानुसार, काही बंद्यांना मध्यवर्ती कारागृहात वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

बीड कारागृहात ॲलन फोन सुविधेचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे, कारागृह प्रशासनाने न्यायाधीन बंदी अमिर शेख याची स्मार्टकार्ड सुविधा एक महिन्यासाठी तात्पुरती बंद केली आहे.

तसेच घटनेच्या दिवशी अंतर्गत सुरक्षा व कारागृह चार्जची जबाबदारी असलेल्या, तुरुंग अधिकारी (श्रेणी-२) या अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या दिनांक १७/०४/२०२६ रोजीच्या आदेशानुसार, बंदी अजहर पठाण हा दिनांक २४/०४/२०२६ रोजी बीड कारागृहातून जामीनावर मुक्त झाला आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील विविध पाणथळ क्षेत्रांचा दर्जा नाकारल्याबाबत

**(३६) * १०२३० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील एन.आर.आय. आणि टी.एस. चाणक्य परिसरातील पाणथळ क्षेत्रे ही स्थलांतरित फ्लेमिंगो पक्ष्यांसाठी अत्यंत महत्त्वाची निवासी ठिकाणे असतानाही, ठाणे जिल्हास्तरीय पाणथळ समितीने या जागांना ‘वेटलँड’ (पाणथळ जागा) मानण्यास नकार दिल्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र असंतोष पसरला असून सदर जिल्हास्तरीय समितीने ‘पाणथळ जागा (संवर्धन व व्यवस्थापन) नियम, २०१७ चा आधार घेऊन जागांची कृत्रिम उत्पत्ती, पूर्वीचा जमिनीचा वापर आणि विकास आराखड्यातील वर्गीकरण या तांत्रिक कारणांवरून सदर क्षेत्रांना वेटलँडचा दर्जा नाकारला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ‘लोटस लेक’ (Lotus Lake) परिसराचा पूर्वी भातशेतीसाठी वापर व नंतर विकासासाठी झालेले हस्तांतरण, तसेच ‘ज्वेल ऑफ नवी मुंबई’ हा तलाव कृत्रिमरीत्या पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी तयार करण्यात आल्याने समितीने त्यांना वेटलँड मानण्यास नकार दिला असून घणसोली आणि गोठीवली तलावांचाही वेटलँड दर्जा नाकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरराष्ट्रीय ‘रामसर करारानुसार’ वेटलँडची व्याख्या अत्यंत व्यापक असून त्यात नैसर्गिक किंवा कृत्रिम, कायमस्वरूपी किंवा तात्पुरते गोड्या व खाऱ्या पाण्याचे सर्व प्रकार समाविष्ट असून जिल्हा समितीने या आंतरराष्ट्रीय मानदंडांचा विचार न केल्याचा गंभीर आरोप पर्यावरण संस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा समितीच्या या वादग्रस्त निर्णयामुळे नवी मुंबईतील जैवविविधतेला धोका निर्माण होण्याचा आणि या जागांवर बांधकाम भूमाफियांचे अतिक्रमण होण्याची शक्यता असून पर्यावरणप्रेमींनी तीव्र आंदोलन व न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी स्थानिक जैवविविधतेचे व फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिवासाचे रक्षण करण्यासाठी तसेच पाणथळ जागांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) कांदळवन कक्ष मुंबई यांच्या अहवालानुसार ठाणे खाडी ही फ्लेमिंगो व इतर स्थलांतरित पक्ष्यांचे महत्वाचे आश्रयस्थान असल्यामुळे ठाणे खाडीचा १६९०५ चौ. कि. मी. क्षेत्र हे फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून सन २०१५ मध्ये घोषित करण्यात आले आहे. तसेच ठाणे खाडीतील जैवविविधतेचे महत्व लक्षात घेऊन सन २०२२ मध्ये ठाणे खाडीतील ६५.२१ चौ. कि. मी. क्षेत्राला रामसार क्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य वन्यजीव मंडळाने दिनांक १७/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये डी. पी. एस. तलाव या क्षेत्रास फ्लेमिंगो पक्षांचा अधिवास असल्याने त्यांना संरक्षित करण्याच्या अनुषंगाने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यास मंजूरी दिली आहे. राज्य शासनाने वेटलँड (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ मधील तरतुदींनुसार राज्यातील पाणथळ क्षेत्राचे ब्रीफ डॉक्युमेंट बनविण्यासाठी National Centre for Sustainable Coastal Management (NCSCM) या संस्थेस दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी करारबध्द केले आहे. या करारानुसार केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या वेटलँड ॲटलास मध्ये नमूद पाणथळ क्षेत्रांचे जिल्हानिहाय सीमांकन ठरवणे, भू-निरीक्षण (Ground Truthing), नकाशे आणि संक्षिप्त दस्तऐवज तयार करणे या बाबी अंतर्भूत आहेत. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्यातील पाणथळ क्षेत्रांबाबत NCSCM या संस्थेने सादर केलेल्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने, SAC २०२१ नुसार एकूण २३,४१५ पाणथळ क्षेत्रांपैकी २३,४१५ क्षेत्रांचे सीमांकन पूर्ण झाले असून २३,४०४ पाणथळ क्षेत्रांचे भू-निरीक्षण (Ground Truthing)पूर्ण झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील पाणथळ क्षेत्रांबाबत NCSCM या संस्थेकडून प्राप्त झालेले ब्रीफ डॉक्युमेंट ठाणे जिल्हा वेटलँड समितीस पाठविण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील ‘मनी एज ग्रुप’ कंपनीकडून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(३७) * ८७४८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे अधिक परताव्याचे आमिष दाखवून ३५ पेक्षा अधिक गुंतवणूकदारांची सुमारे ३.०४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मनी एज ग्रुप या कंपनीच्या संचालकांविरुध्द सिताबर्डी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित 'मनी एज ग्रुप' कंपनीला भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (SEBI) अथवा अन्य कोणत्याही शासकीय किंवा वित्तीय नियामक संस्थेकडून गुंतवणूक स्वीकारण्याची अधिकृत परवानगी देण्यात आली होती काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, अधिक परताव्याचे आमिष दाखवून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या बोगस गुंतवणूक कंपन्या, वित्तीय संस्था व ऑनलाईन गुंतवणूक योजनांविरुध्द कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक व दंडात्मक कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) "मनी एज ग्रुप" ऑफ कंपनी व सदर कंपनीच्या सहकारी कंपन्यांनी गुंतवणुकदारांना पोर्टफोलीओ मॅनेजमेंट सर्विसच्या माध्यमातून १२ ते १५ टक्के वार्षिक परतावा देण्याचे आमिष दाखवून ठेवी स्वीकारल्या. तथापि, त्यानुसार लाभ न देता गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने मनीएज समुह यांचे विरुध्द मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई येथे तसेच सिताबर्डी पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील एकूण ५ आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ३ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे. अटक आरोपींपैकी एका आरोपीस मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी जामीन मंजूर केला असून इतर दोन आरोपी न्यायलीन कोठडीत आहे.सदर कंपनीने भारतीय प्रतिभुती आणि विनिमय मंडळ (SEBI) यांच्याकडून कोणतीही परवानगी प्राप्त केली नसल्याचे तसेच सदर कंपनी नोंदणीकृत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कंपनीने एकूण २०३८ गुंतवणुकदारांची सुमारे रुपये २१४.४३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,१९९९ मधील तरतुदीनुसार सदर कंपनी व सहयोगी कंपन्यांच्या मालमत्ता शासन अधिसूचना दिनांक ०८/०४/२०२६ अन्वये जप्त करण्यात आली असून सदर मालमत्तांवर नियंत्रण ठेवून अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का),मालाड, जि.मुंबई यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जड यंत्रसामग्री वाहनांची खाजगी नोंदणी करुन व्यावसायिक कामांसाठी वापर करण्यात येत असल्याबाबत

**(३८) * ९३६८ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोड रोलर, जेसीबी (JCB), अर्थ-मुव्हिंग इक्विपमेंट, क्रेन, हायड्रा इत्यादी जड यंत्रसामग्रीची वाहने सध्या मोठ्या प्रमाणावर 'खाजगी' प्रवर्गात नोंदविली जात असून, प्रत्यक्षात त्यांचा वापर व्यावसायिक व भाडेतत्त्वावर (Commercial/Lease) केला जात असल्याने शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अशा प्रकारे खाजगी नोंदणी असूनही अनधिकृतपणे व्यावसायिक कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या जड यंत्रसामग्रीच्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून याबाबत विभागाने अद्यापपर्यंत अशा वाहनाचे सर्वेक्षण केलेले नसून सदर गैरप्रकारामुळे शासनाच्या परिवहन विभागाचे वार्षिक महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जड वाहनांचा वापर व्यावसायिक कामांसाठी होत असल्याने, त्यांची नोंदणी टी परमिट (Transport Permit/Commercial) अंतर्गत अनिवार्य करण्याबाबत तसेच भविष्यात होणारे महसुली नुकसान टाळून वाहनांची तपासणी करण्यासाठी आणि नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) केंद्र शासनाच्या दिनांक ०५/११/२००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार रोड रोलर, जेसीबी (JCB), अर्थ-मुव्हिंग इक्विपमेंट, क्रेन, इ. वाहने परिवहनेतर संवर्गामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. त्यामुळे, अशा वाहनांची नोंदणी राज्यामध्ये परिवहनेतर संवर्गात केली जाते.
(२) व (३) वाहनांच्या नोंदणीबाबतचे नियम हे केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येतात व त्यानुषंगाने वाहन नोंदणीची कार्यवाही परिवहन विभागाकडून करण्यात येते. सदर प्रकारातील यंत्रसामुग्री असलेल्या वाहनांवर आकारण्यात येणारा मोटार वाहन कर हा वाहनांच्या वजनावर आधारित होता.तसेच सदर कर हा मासिक, त्रैमासिक, वार्षिक व एकरकमी अशा विविध स्वरुपात भरण्याची तरतूद होती. दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे या वाहनांना एकरकमी कर लागू करण्याबाबतची सुधारणा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर चित्रनगरी व कर्जत येथील एन.डी. स्टुडिओमधील जागा विवाह सोहळे व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भाडेतत्त्वावर देण्याबाबत

**(३९) * ८८०२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चित्रनगरी व स्टुडिओ संकुलांमध्ये चित्रपट चित्रिकरणासाठी आधुनिक सुविधा, प्रशस्त मोकळी जागा आणि आकर्षक लोकेशन्स उपलब्ध असून कोल्हापूर चित्रनगरी तसेच कर्जत येथील एन.डी. स्टुडिओच्या परिसरात विवाह सोहळे, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर खाजगी समारंभांसाठी जागा उपलब्ध करून देऊन महसूल वाढविण्याबाबत शासनाने माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्देशाच्या अनुषगांने याबाबत सविस्तर अभ्यास करून एक स्वतंत्र धोरण (Policy) तयार करुन ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करून व्यावसायिक वापर करण्यासाठी अटी व शर्ती निश्चित करण्याबाबत देखील सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ व२ संदर्भात सदर धोरण निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे आहे.

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाचे दिनांक २१/०४/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये कोल्हापूर चित्रनगरीमध्ये चित्रिकरणासोबतच विवाह सोहळे, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर समारंभांना परवानगी देण्यासाठी अभ्यास करुन धोरण ठरविण्याचे निर्देश दिलेले आहेत. यानुषंगाने धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच एन.डी. स्टुडिओ, कर्जत अंतर्गत संचालक मंडळाच्या दिनांक २१/०४/२०२६ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये एन.डी. स्टुडिओच्या परिसरातील चित्रिकरण स्थळे इतर सोहळयासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न भाग १ व २ संदर्भात कोल्हापूर चित्रनगरी महामंडळांतर्गत धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तर एन.डी. स्टुडिओमध्ये विवाह सोहळे व इतर कार्यक्रमासाठी चित्रिकरण स्थळ उपलब्ध करुन देण्याबाबत दरपत्रकाची माहिती एन.डी. स्टुडिओच्या संकेतस्थळ, मोबाईल ॲप्लीकेशन तसेच बुकिंग साईटवर उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनांची तपासणी करण्याकरीता स्वयंचलित चाचणी केंद्रे कार्यान्वित करण्याबाबत

**(४०) * ९६७० श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये स्वयंचलित चाचणी केंद्रे कार्यान्वित नसल्याने व्यावसायिक वाहनांची योग्यता चाचणी प्रक्रिया पूर्णपणे कोलमडली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुविधा उपलब्ध नसल्यामुळे हजारो वाहनधारकांना आणि वाहतूकदारांना योग्यता प्रमाणपत्रासाठी इतर जिल्ह्यात जावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असून ११ जिल्ह्यांमध्ये ही सेवा विलंबाने सुरू झाली आहे सदर विलंबाची तांत्रिक व प्रशासकीय कारणे काय आहेत व त्यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'पीपीपी' तत्त्वावर नवीन केंद्रे सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यतील सर्व जिल्ह्यांमध्ये स्वयंचलित चाचणी केंद्रे (ATS) तातडीने आणि पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी तसेच तांत्रिक अडचणीमुळे ज्या वाहनांची फिटनेस मुदत संपली आहे, अशा वाहनधारकांना दंडातून सवलत देण्याबाबत व नवीन केंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील पिंपरी चिंचवड, अमरावती, बारामती, श्रीरामपूर, बुलढाणा, अकोला, वााशिम, धाराशिव या कार्यालयांचा परिवहन पोर्टल ॲक्सेस दिनांक ०१/०३/२०२६ पासून व पनवेल, हिंगोली, जालना या कार्यालयांचा दिनांक ०१/०४/२०२६ पासून काढून घेण्यात येत असल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर कार्यालयांमध्ये वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र तपासणीचे काम काही कालावधीसाठी बंद करण्यात आले होते.

(२) परिवहन संवर्गातील वाहनांची योग्यता प्रमाणपत्र तपासणी केवळ मान्यताप्राप्त स्वयंचलित तपासणी केंद्राद्वारे करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये बंधनकारक केले असल्यामुळे राज्यात ५३ ठिकाणी शासकीय मालकीचे स्वंयचलित तपासणी केंद्र स्थापन करण्यात येत आहेत.

(३) वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र नसलेल्या परिवहन वाहनांना आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या वसुलीस सद्य:स्थितीत स्थगिती आहे. राज्यातील ५३ ठिकाणी असलेल्या स्वयंचलित तपासणी केंद्रांची उभारणी (Automated Testing Stations) वेळेत पूर्ण करुन सदर केंद्रे कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना संबंधित सेवापुरवठादारांना देण्यात आल्या आहेत. तसेच केंद्रिय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या दिनांक २१/०४/२०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने राज्यातील परिवहन कार्यालयांचे परिवहन पोर्टल ॲक्सेस परत केले आहेत. वाहनांची योग्यता प्रमाणपत्र तपासणीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अचलपूर-परतवाडा (जि.अमरावती) येथील अल्पवयीन मुली व महिलांचे अश्लील व्हिडिओ तयार करून शोषण केल्याबाबत

**(४१) * ८७१९ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व परतवाडा (जि.अमरावती) येथील काही तरुणींचे अश्लील व्हिडिओ तयार करून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याची बाब आढळून आली असून, या प्रकरणी अयान अहमद तन्वीर या मुख्य संशयित आरोपीस दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपीच्या चौकशीनंतर ‘तरबेज खान तस्लिम खान’ व ‘मोहम्मद साद मोहम्मद सादिक’ या अन्य आरोपींनाही पोलिसांनी अटक केली असून, या प्रकरणात अनेक तरुणी तसेच काही अल्पवयीन मुलींचे शोषण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे तसेच परतवाडा येथे एका तरुणाने विविध तरुणींसोबतचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसिध्द केल्याप्रकरणी अमरावती ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, पोक्सो कायदा व अन्य लागू असलेल्या कायद्यांनुसार कारवाई करण्याबाबत तसेच या प्रकरणात अल्पवयीन मुलींचे व महिलांचे शोषण झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या अश्लील प्रसारणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस स्टेशन परतवाडा हद्दीत एका १९ वर्षीय तरुणाने ७ ते ८ मुलींचे अश्लील व्हिडीओ, फोटो सोशल मिडीयावर व्हायरल केल्याबाबत परतवाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक १३/०४/२०२६ रोजी अप.क्र. २९१/२०२६, भारतीय न्याय संहितेचे कलम २९४, ४५, २३८, ३(५), ७४ सह बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो ॲक्ट) कलम ८,१२,१७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७, ६७(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर आरोपीस दिनांक १४/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्यात एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास जलद, सखोल, अचुक व पारदर्शक व्हावा याकरीता सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी अचलपूर उप विभाग यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत ८ अटक आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असून त्यांच्या विरुध्द मा.न्यायालयात दिनांक १०/०६/२०२६ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

अमरावती ग्रामीण पोलीस घटकांतर्फे "गरुडदृष्टी समाजमाध्यम निगरानी" उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाद्वारे समाज माध्यमांवर महिला व बालकांसंबंधी प्रसारीत होणारे अश्लील व आक्षेपार्ह व्हिडीओ,पोस्ट, रिल्सवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून काही अनुचीत प्रकार समाज माध्यमावर आढळून आल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

पोलीस अधीक्षक, अमरावती कार्यालयामार्फत सुरु असलेल्या सोशल मिडीयावर सायबर जनजागृतीबाबत नियमीत दक्षतापर पोस्ट प्रसारीत करण्यात येतात. तसेच पोलीस स्टेशन स्तरावर विशेष पेट्रोलिंग पथक तयार करुन डेपो, शाळा/कॉलेज येथे महिला पोलीस अंमलदार यांच्याद्वारे पेट्रोलिंग करण्यात येते.

तसेच सोशल मिडीयाद्वारे काही अश्लील किंवा आक्षेपार्ह माहिती/ व्हिडीओ प्रसारण होवू नये याकरीता प्रसार माध्यमांना विशेष सुचना देवून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. सोशल मिडीयाचा वावर करताना घ्यावयाच्या दक्षता बाबत शाळा/कॉलेज येथे जनजागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील 'मेट्रो-३' प्रकल्पाच्या सुरक्षिततेकरीता महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती केल्याबाबत

**(४२)** * **८६८० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पहिल्या भूमिगत व अतिसंवेदनशील 'मेट्रो-३' प्रकल्पाची सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे कंत्राटी पध्दतीवर आधारित असल्यामुळे, सुरक्षेसाठी तैनात महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या (MSF) जवानांमध्ये या कंत्राटी पध्दतीमुळे नाराजी पसरल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांप्रमाणेच जोखीम आणि जबाबदारी असतानाही केवळ कंत्राटी नियुक्तीमुळे सदर जवानांना कायमस्वरूपी सेवेचे लाभ मिळत नाहीत, तसेच कर्तव्यवाटपातील विसंगती व वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे जवानांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, कंत्राटी स्वरूपामुळे जवानांमध्ये गैरहजेरीचे प्रमाण वाढून त्याचा अतिरिक्त ताण कर्तव्यावर असलेल्या इतर जवानांवर येत आहे व यामुळे मेट्रोच्या संवेदनशील सुरक्षेला बाधा पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर जवानांना आवश्यक सुरक्षा सुविधा व विमा संरक्षण उपलब्ध करून देऊन त्यांना सेवा संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील भूमिगत मेट्रो ३ रेल्वे या आस्थापनेस महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून तीन टप्प्यात सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आली असून एकूण १३७६ सुरक्षा कर्मी सुरक्षेसाठी पुरविण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र सुरक्षा बलाची निर्मिती महाराष्ट्र राज्य सुरक्षा अधिनियम २०१० नुसार करण्यात आलेली आहे. त्यामधील कलम ४ नुसार महाराष्ट्र सुरक्षा बल गठीत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कलम ६ नुसार महाराष्ट्र सुरक्षा बलामधील सुरक्षा रक्षकांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीवर करण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे नियुक्ती करतेवेळीच महाराष्ट्र सुरक्षा बल मधील नोकरी कंत्राटी तत्वावर असल्याची पूर्ण माहिती सुरक्षा कर्मींना असते.

अशा प्रकारे अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतूदीनुसार महाराष्ट्र सुरक्षा बल गठीत करून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीवर करण्यात आली असल्याने असंतोष (नाराजी) पसरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) सुरक्षाकर्मींच्या नियुक्ती, कर्तव्य वाटप व बदल्या या संदर्भात सुस्पष्ट असे पारदर्शक नियम करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सुरक्षा रक्षकांच्या प्रशासकीय, पदोन्नतीने किंवा कसुरी या कारणास्तव बदली विषयक नियमातील तरतूदीनुसार बदल्या करण्यात येतात.

गैरहजर सुरक्षाकर्मी यांच्या बदली अन्य सुरक्षा कर्मींच्या नेमणूका तातडीने करण्यात येतात. त्यामुळे इतर सुरक्षा रक्षकांवर अतिरिक्त ताण पडण्याची अथवा आस्थापनेच्या सुरक्षेला बाधा पोहोचण्याची शक्यता निर्माण होत नाही.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळा अंतर्गत स्थापित महाराष्ट्र सुरक्षा बलामधील सुरक्षाकर्मी यांच्या कंत्राटी नियुक्ती असल्या तरी त्यांना वेतना व्यतिरिक्त इतर अनेक सुविधा खालीलप्रमाणे दिल्या जातात.

- सर्व सुरक्षा रक्षकांना त्यांच्या वेतन बचत खात्यावर रुपये ४५ लाखाचे अपघाती विमा संरक्षण देण्यात आलेले आहे. तसेच अपघाती विकलांगता आल्यावर देखील रुपये ४५ लाखाचे विमा कवच देण्यात आलेले आहे.

- वेतन बचत खातेदाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रुपये ३ लाख विमा कवच देण्यात आलेले आहे.
- सुरक्षा कर्मीला वेतन बचत खात्यावर Hospital Cash Benefit सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्याव्दारे सुरक्षा कर्मी हॉस्पीटलमध्ये आंतररूग्ण म्हणून दाखल झाल्यास प्रतिदिवस रुपये १०००/- प्रमाणे १५ दिवसापर्यंत आर्थिक लाभ देण्यात येतो.
- सर्व सुरक्षा रक्षकांना प्रत्येक वर्षी रुपये ५०००/- ते रुपये ७०००/- इतका बोनस दिला जातो.
- रुपये २१,०००/- व त्याखालील वेतन असलेल्या सुरक्षा रक्षकांना ESIC सुविधेचा लाभ दिला जातो.
- ESIC सुविधा अनुज्ञेय नसलेल्या महिला सुरक्षा रक्षकांना महामंडळाकडून वेतनी ०३ महिन्याची प्रसूती रजा दिली जाते.
- ESIC सुविधा देय असलेल्या महिला सुरक्षा रक्षकांना ESIC कडून वेतनी ०६ महिन्याची प्रसूती रजा दिली जाते.
- सर्व सुरक्षा रक्षकांना दरवर्षी गणवेश भत्ता रुपये २४९०/- दिला जातो.
  सर्व सुरक्षा रक्षकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभही दिला जातो.
- सर्व सुरक्षा रक्षकांना EPF सुविधेचा लाभ दिला जातो. त्याअंतर्गत सुरक्षा कर्मीच्या वेतनातून १२% व वेतना व्यतिरिक्त महामंडळाकडूनही १२% सुरक्षा कर्मीच्या EPF खाती दरमहा जमा केले जातात.
- सर्व सुरक्षा रक्षकांना Basic + DA च्या ४०% घरभाडे भत्ता दिला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर शहर व परिसरात बर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३)** * **९५६५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर शहर व परिसर (जि.नंदुरबार) येथे बर्ड फ्लूचा (H५N१ विषाणू) तीव्र संसर्ग वाढल्यामुळे कलिंग ऑपरेशन राबविण्यात येत असल्याची बाब दिनांक ३ मे,२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संसर्ग अधिक पसरू नये म्हणून बाधित क्षेत्रातील १ किलोमीटरच्या परिघातील ४ लाखांहून अधिक कोंबड्या शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट (कलिंग) करण्यात आल्या असून, २५ लाख अंडी आणि ५४८ टन पक्षी खाद्य (पोल्ट्री फीड) पूर्णपणे नष्ट करण्यात आल्याचे तसेच शहरातील चिकन दुकाने, अंडी विक्री केंद्र आणि बिर्याणी सेंटर बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पोल्ट्री कर्मचाऱ्यांचे आणि फ्रंटलाईन वर्कर्सचे मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय स्क्रिनिंग (तपासणी) सुरू करणेबाबत तसेच व्यावसायिक व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, खरे आहे.

(२) प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाने बर्ड फ्ल्यु रोगाकरीता निर्गमित केलेल्या राष्ट्रीय कृती आराखडा-२०२१ नुसार संसर्ग केंद्रापासून १ किलो मीटरच्या परीसरातील कुक्कुट पक्षी, अंडी तसेच पक्षी खादय शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करण्यात आले होते. तसेच प्रक्षेत्रांचे निर्जंतुकिकरण होईपर्यंत चिकन दुकाने, अंडी विक्री केंद्र बंद करण्यात आली होती.

(३) आरोग्य विभागामार्फत ९ पोल्ट्री कर्मचाऱ्यांचे आणि फ्रंटलाईन वर्कर्सची बर्ड फ्ल्यु करीता चाचणी करण्यात आली होती. सदर चाचण्यांसाठी घेतलेले सर्व नमुने नकारार्थी असल्याचा अहवाल राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान,पुणे यांनी दिला आहे.

नष्ट करण्यात आलेल्या पक्षी, अंडी तसेच पक्षी खादय नुकसानभरपाई देणेकरीता केंद्र शासनाच्या पशु स्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम या योजनेतील अँस्कँड या उपयोजनेतून ५० % केंद्र हिस्सा व ५० % राज्य हिस्सा याप्रमाणे नुकसानभरपाई देण्यात येते. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्याबाबत

**(४४) * ९४५१ श्री.सचिन अहिर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी एसटी महामंडळ आणि आरटीओ कार्यालयाच्या संयुक्त पथकांमार्फत दिनांक १ मार्च, २०२६ पासून विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना मा.परिवहन मंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवाना, फिटनेस प्रमाणपत्र व विमा नसताना प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांना नुकसानभरपाई मिळण्यात अडचणी येत आहेत, सदर सूचना देऊन एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्याप क्षेत्रिय स्तरावर संयुक्त पथकेच स्थापन करण्यात आली नसल्याची बाब आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संयुक्त पथके स्थापन न झाल्यामुळे अवैध वाहतुकी विरोधातील नियोजित दंडात्मक कारवाई प्रत्यक्षात अद्याप सुरूच झालेली नाही, तसेच शासनस्तरावरून स्पष्ट आदेश असतानाही अशी संयुक्त पथके स्थापन होण्याची किंवा विलंब लागण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(४) असल्यास, संबंधित विभागांची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तदनुसार, कर्तव्यपालनात कसूर करणाऱ्या व शासनाच्या आदेशाच्या अंमलबजावणीस विलंब करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) उन्हाळी सुट्टीतील वाढती प्रवासी मागणी पाहता व राज्यात सुरु असलेल्या अवैध प्रवासी वाहनांवर अंकुश ठेवण्यासाठी तसेच अपुऱ्या कागदपत्रांसह नियमबाह्य प्रवासी वाहतूक, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारच्या वाहनांविरुध्द दिनांक १ मार्च २०२६ पासून राज्यात विशेष मोहिम राबविण्याबाबत संबंधित अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. सदर मोहिम ही परिवहन आयुक्त कार्यालय आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या समन्वयाने राबविण्यात येत आहे.

राज्यातील प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकांद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन व अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुध्द माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ मध्ये करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

एप्रिल २०२५ ते मार्च २०२६

| अ.क्र. | तपासलेली वाहने | अवैध प्रवासी वाहतूक करणारे दोषी वाहने | एकूण दंड वसूली (रुपये लाखात) |
|---|---|---|---|
| १. | ९५०७८ | ११९४० | ४३२.७६ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृध्दी महामार्गावर निधोना (जि.जालना) येथे टँकरमधून ज्वलनशील रसायनची गळती झाल्याबाबत

**(४५) * ८७५२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृद्धी महामार्गावर निधोना (जि.जालना) शिवारात अमोनियम मेल्ट नायट्रेट हे ज्वलनशील रसायन वाहून नेणाऱ्या टँकरमधून रसायनाची गळती झाल्यामुळे महामार्गावरील वाहतूक सुमारे २५ किलोमीटरपर्यंत खोळंबली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टँकर कंपनीने धोकादायक आणि ज्वलनशील रसायनांची वाहतूक करताना सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे व अक्षम्य निष्काळजीपणामुळे गळती झाली असल्याचे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण झाला असून महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याबद्दल संबंधित टँकर चालक तसेच उक्त प्रकरणी घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी कंपनीवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) समृध्दी महामार्गावर निधोना (जि.जालना) परिसरामध्ये अमोनियम मेल्ट नायट्रेट हे ज्वलनशील रसायन वाहून नेणाऱ्या टँकरमधून रात्रीच्या सुमारास गळती झाली होती.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने प्रथम माहिती अहवाल (FIR) क्रमांक ०१७१ अन्वये दिनांक ०७/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ९ मधील तरतूदीनुसार धोकादायक व घातक रसायनांची वाहतूक करणाऱ्या परिवहन वाहनांच्या चालकांना प्रशिक्षण देण्याबाबत दिनांक १४/०८/२०२४ अन्वये सुधारित मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या आहेत. तसेच मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १९० (३) अन्वये नियमभंग करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.